प्रकरण पहिले

औरंगाबाद शहराची पार्श्वभूमी

१.१ प्रस्तवना

१.१ लोकसंख्या

१.३.२ शहराची धर्मानुसार लोकसंख्या

१.३ भाषांची टक्केवारी

१.४ लोकसंख्यावाढीतील फरक

१.५ धर्मानुसार लोकसंख्या सन २०११

१.६ तालुका निहाय लोकसंख्या

१.७ ग्रामीण व नागरी स्त्री-पुरुष प्रमाण

१.३.८ अनुसूचित जाती जमातीच्या लोकसंख्येची तहसील निहाय टक्केवारी

१.९ जिल्हा ग्रामीण व नागरी लोकसंख्या सन २०११

१.१० समारोप

प्रकरण पहिले

औरंगाबाद शहराची पार्श्वभूमी

१.१ प्रस्तावनाः-

भारत हा एक कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. या देशांमध्ये सर्वाधिक लोकसंख्या ही शेती क्षेत्रावर अवलंबून आहे, परंतु अलिकडील काळामध्ये वाढणा-या लोकसंख्येचा विचार केला असता या क्षेत्रावर उपजीविका करणे जवळ जवळ अशक्य होत आहे. कारण शेतजमीन आहे तेवढीच व त्यावर पोट भरणा-या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली असल्यामुळे त्याला पर्याय शोधणे गरजेचे आहे. परिणामी लोक आपल्या जमिनीच्या क्षमतेनुसार इतरत्र काम शोधण्याचे कार्य करीत असतात.[१]

ग्रामीण भागामध्ये ज्यांच्याकडे जास्त जमीन असते असे लोक सहसा इतरत्र कामासाठी जात नाही, परंतु ज्यांच्याकडे जमीन कमी असते किंवा बारमाही पाण्याची सोय नसते असे लोक इतरत्र काम शोधण्यासाठी जातात. विशेष म्हणजे ज्यांच्याकडे जमीन अत्यंत कमी आहे किंवा अजिबात जमीन नाही असे लोक शेतामध्ये मजुरी करण्यापेक्षा शहरांमध्ये जाऊन उद्योग-व्यवसायात नोकरी किंवा इतर वैयक्तिक व्यवसायामध्ये कार्य करणे अधिक पसंत करतात.[२] परिणामी शहरांमध्ये स्थलांतरित लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शहरांमध्ये येणा-या ग्रामीण लोकांसाठी काम असते, परंतु काही काम हे कौशल्यावर आधारित असतात ज्याचे प्रशिक्षण घेण्यासाठी वेळ आणि पैसा दोन्ही लागतात. ग्रामीण भागातून शहरी भागामध्ये आल्यानंतर तात्काळ काम मिळवण्यासाठीही लोक मिळेल ते काम करायला तयार असतात. ज्यामध्ये हॉटेल व्यवसायात वेटर, धुनी भांडी करण्यासाठी मोलकरीण यासारखे कामे करतात. त्याचप्रमाणे शहरी भागातील सर्वात लवकर आणि चांगले पैसे मिळवून देणारे काम म्हणजे बांधकाम उद्योगातील बिगारी काम होय. या कामासाठी कोणत्याही प्रकारच्या कौशल्याची आवश्यकता नसते. त्यामुळे ग्रामीण भागातून येणारे लोक बहुसंख्य या कामांमध्ये गुंततात. पुरुषाप्रमाणे स्त्रियांना देखील कामाची आवश्यकता असते. घरामध्ये मोलकरीण काम व इतर ठिकाणी काम करण्यापेक्षा बहुतेक

महिला बांधकाम उद्योगांमध्ये अकुशल कामगार म्हणून कार्य करीत असतात. हे कार्य करीत असताना त्यांच्या जीवनामध्ये येणा-या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी संबंधित संशोधनाची निवड करण्यात आलेली आहे. Registrar General & census Commissioner of India यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार भारतातील कामगार वर्ग जगातील सर्वात मोठा कामगार वर्ग आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार भारतात २०११च्या जनगणनेनुसार १४९.८ महिला कामगार आहेत. तर त्यात शहरी भागात काम करणा-या महिलांची संख्या १२१.८ व ग्रामीण भागात काम करणा-या महिलांची संख्या २८.० दशलक्ष आहे. वरील दिलेल्या आकडेवारीतील शहरी महिला कामगारांपैकी ३५.९ दशलक्ष महिला उद्योग व इतर व्यवसायात काम करतात ६१.५ इतक्या महिला कृषी व त्यावर आधारित उद्योगात काम करतात. ८.५ घरगुती तर ४३.७ टक्के दशलक्ष इतर क्षेत्रांमध्ये कार्य करतात. सदरील संशोधनाच्या शीर्षकानुसार औरंगाबाद जिल्ह्याची माहिती संशोधनासाठी अपेक्षित आहे. म्हणून औरंगाबाद जिल्हा व शहराची सामाजिक आर्थिक राजकीय माहिती पहिल्या प्रकरणात दिलेली आहे.[३]

१.२ औरंगाबाद शहराचा समग्र आढावा:-

औरंगाबाद शहर प्राचीन काळातही समृध्द होते. प्राचीन औरंगाबाद लेणी परिसर यास साक्षीदार आहे. पितळखोरा, अजिंठा, वेरुळ आदी स्थानांबरोबरच विकसित झालेले हे स्थान त्यावेळी राजतडाग या नावाने ओळखले जात होते. या नगराचा नव्याने विकास झाला तो मलिक अंबरच्या काळात. दौलताबाद येथील निजामशाहीचा तो वजीर होता. त्यानेच सन १६१० मध्ये निजामशाहीची राजधानी दौलताबादहून औरंगाबादेत आणली. त्यावेळी या गावाचे नाव ‘खडकी’ होते. नवखंडा महाल ही त्याचीच निर्मिती होय. येथे त्याची राजधानी होती. मलिक अंबरचा मुलगा फतेहखान याने औरंगाबादचे नाव फतेहनगर ठेवले होते. या नंतर औरंगाबाद दिल्लीच्या मोगल साम्राज्यात समाविष्ट झाले. प्रथम शहाजहानने हे शहर जिंकले. त्यांच्यानंतर औरंगजेब येथे दोन वेळा सुभेदार म्हणून राहिला. औरंगजेबची शेवटची २५ वर्षे याच शहरात गेली. त्यानेच फतेहनगर हे नाव बदलून १६५३

साली या शहरास औरंगाबाद हे नाव दिले. पुरातत्व आणि शिल्पकलात्मक दृष्टिकोणातूनही औरंगाबाद जिल्हा समृध्द आहे. अजिंठा लेणी येथील आतील बाजूस केलेले रंगीत चित्रकला ही इ. स.पूर्वी १४ व्या शतकाच्या कालावधीत केलेली असून, अति सुंदर तर आहेतच त्याच बरोबर देशाच्या जून्या परंपरेच्या उत्कर्षाची आठवण देते. करून देणारी आशी आहसातवाहन राज्याची राजधानी प्रतिष्ठाण सध्याचे पैठण या नावाने प्रसिध्द होती. हे शहर त्यावेळेस देशातीलच नव्हेतर जगातील रेशीम उद्योगाचे मोठे केंद्र होते. येथून सिल्कचा परदेशाशी व्यापार करण्यात येत होता. असे म्हणण्यास पुरेसे पुरावे मिळाले आहेत. ८ व्या शतकात दिडशे वर्षाहून अधिक कालावधीत माणसाच्या परिश्रमाने डोंगरात शिल्प कलेच्या सुंदर नमून्यात टाकून तयार केलेली जग प्रसिध्द वेरुळ येथील लेणीमुळे हया जिल्हयाचे नाव जगाच्या नकाशावर झळकत आहे. इ.स. ११८७ मध्ये राजा भिल्लम यादव यांनी बांधलेला दौलताबाद येथील ऐतिहासिक देवगिरीचा किल्ला हा त्या वेळेसच्या वास्तूमध्ये आशिया खंडातील सर्वात श्रेष्ठ असा नमूना मानला गेला आहे. दौलताबाद हे मंहमद तुघलकच्या राज्यात भारताचे अल्पकालावधीसाठी राजधानीचे ठिकाण होते. या शहराची स्थापना मलिक अंबर याने इ.स. १६१० साली खडकी या पूर्वीच्या नावावरुन केली या शहराचे नाव फत्तेपूर व औरंगाबाद असे काळाच्या ओघात बदलत गेले. अजिंठा व वेरुळ ही दोन ठिकाणे युनेस्को या जागतिक संघटनेने जागतिक वारसा ठिकाणे म्हणून मान्यता दिल्यामुळे जागतिक पर्यटन स्थळांचा दर्जा प्राप्त झाला आहे. १ मे, १९८१ या दिवशी औरंगाबाद जिल्हयाचे विभाजन झाले व औरंगाबाद, खुलताबाद, कन्नड, सोयगाव, सिल्लोड, पैठण, गंगापूर वैजापूर व फुलंब्री असे ९ तालूके मिळून औरंगाबाद जिल्हयाची पूर्नस्थापना करण्यात आली व उर्वरित चार तहसिल म्हणजे जालना, अंबड, भोकरदन व जाफराबाद तालूक्यांचा समावेश जालना जिल्हयात करण्यात आला. २६ जून, १९९९ रोजी औरंगाबाद तालूक्याची ३१ गावे खुलताबाद तालूक्याची ५ गावे, सिल्लोड तालूक्याची ४२ गावे, कन्नड तालूक्याची १० गावे मिळून फुलंब्री हा नवीन तालुका निर्माण झाला. सध्या औरंगाबाद जिल्हयात एकूण ९ तालूके आहेत.[४]

१.३.१ औरंगाबाद शहराची लोकसंख्याः-

लोकसंख्या ही देशाची संपत्ती असते. व ती तरुण गटातील असेल, तर विकासाच्या गतीला अधिक चालना मिळते कारण काम करणा-या हातांची संख्या त्या देशांमध्ये अधिक असते. खालील तक्त्यामध्ये औरंगाबाद शहराची लोकसंख्या १९०१ ते २०११ या दरम्यान दिलेली आहे.[५]

तक्ता क्र.१.३.१
औरंगाबाद शहराची लोकसंख्या १०९१ ते २००१ (प्रमाण हजारात)

अ.क्र.	वर्ष	लोकसंख्या	प्रत्यक्ष बदल
१	१९०१	३६,८३७	-
२	१९११	३४,९०२	१,९३५
३	१९२१	३६,८७६	१,९७४
४	१९३१	३६,८७०	६
५	१९४१	५०,९२४	१४,०५४
६	१९५१	६६,६३६	१५,७१२
७	१९६१	९७,७०१	३१,०६५
८	१९७१	१,६५,२५३	६७,५५२
९	१९८१	३,१६,४२१	१,५१,१६८
१०	१९९१	५७३,२७२	२,५६,८५१
११	२००१	८,७३,३११	३,००,०३९
१२	२०११	१,१७५,११६	३,०१,८०५

स्त्रोत:- http://www.census2011.co.in.
सर्व लोकसंख्येला १९०१ च्या ३६,८३७ ने वजा करून फरक काढण्यात आले.

विश्लेषणः-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद शहराची लोकसंख्या १९०१ यावर्षी ३६,८३७ होती. ती १९११ यावर्षी ३४,९०२ झाली. १९०१ च्या तुलनेत लोकसंख्या १,९३५ ने कमी झाली. १९११ ते १९२१ या कालावधीमध्ये लोकसंख्या घट ५.२५% होती. नंतरच्या काळामध्ये आरोग्य क्षेत्रात खूप सुधारणा झाल्या आणि १९२१ या जनगणनेनुसार औरंगाबाद शहराची लोकसंख्या ३६,८७६ झाली. त्यामध्ये ५.६६% ने वाढ झाली. पुन्हा १९३१ मध्ये १९२१ च्या तुलनेत लोकसंख्या वाढणे अपेक्षित होते; परंतु प्रत्यक्षात त्यात पुन्हा

घट झाली त्यामागील कारण या काळामध्ये बालमृत्यूचे प्रमाण जास्त होते. त्यावर सरकारने सकारात्मक उपाययोजना केल्या व त्याचा परिणाम १९४१ साली औरंगाबाद शहराची लोकसंख्या ५०,९२४ झाली, त्यात प्रत्यक्ष १४,०५४ इतक्या लोकसंख्येची भर पडली. मागील काही दशकांत ही वाढ सकारात्मक आहे. १९४१ नंतरच्या काळात प्रत्येक दशकात ३०.८५%, ४६.६२%, ६९.१४%, ९१.४८%, ८१.१७%, ५२.३४% याप्रमाणे लोकसंख्येमध्ये सतत वाढ झाली. २०२१ यावर्षी औरंगाबाद शहराची लोकसंख्या ११,७५,११६ आहे. मागील जनगणनेच्या तुलनेत, त्यात ३,०१,८०५ इतकी वाढ झाली.

एकंदरीत १९०१ ते २०११ या वर्षात लोकसंख्येतील बदलांचा अभ्यास केला असता १९८१ यावर्षी औरंगाबाद शहराच्या लोकसंख्येमध्ये खूप जास्त वाढ झाल्याचे दिसते, तर १९११ व १९३१ यावर्षी लोकसंख्येमध्ये घट दिसते. लोकसंख्या घटसाठी इतर अनेक कारणे कारणीभूत असली, तरी त्यात सर्वात महत्त्वाचं कारण म्हणजे बाल मृत्युदराचे प्रमाण हे आहे. मृत्युदराचे प्रमाण जितके कमी तितकी लोकसंख्या अधिक जास्त वेगाने वाढते.

१.३.२ औरंगाबाद शहराची धर्मानुसार लोकसंख्याः-

भारत देश विविधतेने नटलेला आहे. या देशांमध्ये अनेक जाती, धर्माचे व पंथांचे लोक राहतात. इतके सारे धर्म एकत्र नांदवणारा भारत हा जगातील एकमेव देश आहे. त्याचप्रमाणे औरंगाबाद या शहरांमध्ये अनेक जाती, धर्माचे व पंथांचे लोक राहतात.[६]

तक्ता क्र. १.३.२

औरंगाबाद शहराची धर्मानुसार लोकसंख्या २०११ (प्रमाण अंकात)

अ.क्र.	**धर्म**	**एकूण लोकसंख्या**	**एकूण वाटा* (प्रमाण टक्क्यात)**
१	हिंदू	६,००,१८३	५१.०७%
२	मुस्लिम	३,६१,८१७	३०.७९%
३	ख्रिश्चन	१०,०६०	०.८६%
४	शिख	३,४२७	०.२९%
५	बुद्धिस्ट	१,७८,३०७	१५.१७%
६	जैन	१९,०७३	१.६२%
७	इतर	५१५	०.०४%
८	उत्तर दिले नाही	१,७३४	०.१५%

स्त्रोत:- http://www.census2011.co.in

(१,१७५,११६/१००= ११७५१.१६) (लोकसंख्या/११७५१.१६= एकूण वाटा)

विश्लेषण:-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद शहरात हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, बुद्धिष्ट, जैन यासारखे अनेक धर्माचे लोक राहतात. जनगणना २०११ नुसार औरंगाबाद शहराची लोकसंख्या ११,७५,११६ आहे. त्यामध्ये हिंदू धर्माला मानणा-या लोकांची संख्या सर्वात जास्त ६,००,१८३ आहे. एकूण लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार हिंदू धर्माचे प्रमाण ५१.०७% आहे, म्हणून औरंगाबाद शहरातील सर्वात मोठा धर्म हिंदू आहे. त्यानंतर लोकसंख्येनुसार मुस्लिम धर्म हा औरंगाबाद शहरातील दुस-या क्रमांकाचा आहे. या शहरात मुस्लिम धर्माची लोकसंख्या ३,६१,८१७ आहे. त्याचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण ३०.७९% इतके आहे. ख्रिश्चन धर्माची लोकसंख्या १०,०६० तर सिख धर्माची लोकसंख्या ३,४२७ इतकी आहे. लोकसंख्येच्या क्रमवारीत बुद्धिष्ट धर्म औरंगाबाद शहरात तिस-या क्रमांकावर आहे. त्याची लोकसंख्या १,७८,३०७ आहे. जैन धर्माची लोकसंख्या १९,०७३ तर इतर धर्माची लोकसंख्या ५१५ आहे. त्याचप्रमाणे काही लोक असे असतात की, ज्यांना धर्म मान्य नसतो. लोकसंख्येची गणना होत असतांना ते धर्म सांगत नाही अशा लोकांची

संख्या औरंगाबाद शहरामध्ये १,७३४ आहे. व त्यांचे प्रमाण ०.१५% आहे. ख्रिश्चन, जैन व शिख या धर्मातील लोक इतर धर्मांच्या तुलनेत औरंगाबाद शहरामध्ये कमी आहे.

१.३.३ औरंगाबाद शहरातील विविध बोलणार्यांची टक्केवारी:-

औरंगाबाद शहर हे ऐतिहासिक शहर असल्यामुळे या ठिकाणी प्राचीन काळापासून अनेक धर्माचे लोक राहतात. प्रत्येक धर्मातील लोकांची भाषाही वेगळी असते.

तक्ता क्र. १.३.३

औरंगाबाद शहरातील विविध बोलणार्यांची टक्केवारी

अ.क्र.	**भाषा**	**एकूण वाटा (प्रमाण टक्क्यात)**
१	मराठी	५९.०९%
२	उर्दू	२३.४१%
३	हिंदी	११.९८%
४	मारवाडी	१.७२%
५	इतर	३.८०%

स्त्रोत:- http://www.census2011.co.in

विश्लेषण:-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद शहरामध्ये विविध भाषा बोलल्या जातात. जनगणना २०११ नुसार प्रामुख्याने मराठी, उर्दू, हिंदी व मारवाडी या प्रमुख भाषा आहेत. त्यामध्ये मराठी भाषा बोलणा-या लोकांचे प्रमाण सर्वाधिक ५९.०९% आहे, तर दुस-या क्रमांकावर उर्दू भाषा बोलली जाते. औरंगाबाद शहरात हिंदी भाषा बोलणा-या लोकसंख्येचे प्रमाण ११.९८%, मारवाडी भाषा १.७२%, व इतर भाषा बोलणा-यांचे प्रमाण ३.८०% आहे. हिंदी भाषा बोलणा-या लोकसंख्येचे प्रमाण मारवाडी भाषा बोलणा-या लोकसंख्येपेक्षा जास्त आहेत. विशेष म्हणजे सांख्यिकी माहिती नुसार मराठी व उर्दू भाषा बोलणा-यांची संख्या जास्त असली तरी बहुतांश लोक मराठी व हिंदी, उर्दू व हिंदी किंवा मराठी व हिंदी याप्रमाणे इतर भाषेबरोबर हिंदीचा वापर करतात; परंतु त्यांची मायबोली हिंदी नसल्यामुळे ते जनगणनेमध्ये हिंदी भाषेचा उल्लेख करत नाही. परिणामी हिंदी भाषा बोलणा-यांची संख्या अधिक असतांना सुद्धा प्रत्यक्ष टक्केवारीमध्ये ती कमी दिसते.

१.३.४ औरंगाबाद जिल्ह्यातील लोकसंख्यावाढीतील फरक २००१ ते २०११:-

'लोकसंख्या' म्हणजे एखाद्या भौगोलिक प्रदेशात राहणा-या व्यक्तींची संख्या होय. लोकसंख्या मोजण्याला जनगणना किंवा खानेसुमारी म्हणतात. प्रत्येक देश आपल्या लोकसंख्येची ठरावीक कालखंडानंतर गणना करतो. हा कालखंड बहुतेक १० वर्षे एवढा असतो व दरवर्षी वाढीव संख्येचा तपशील प्रकाशित केला जातो. खालील तक्त्यामध्ये औरंगाबाद जिल्ह्याची लोकसंख्यावाढीचा दर दर्शविण्यात आलेला आहे.[८]

तक्ता क्र. १.३.४

औरंगाबाद जिल्ह्यातील लोकसंख्यावाढीतील फरक

अ.क्र.	वर्ष	लोकसंख्या	दशवार्षिक वाढ	दशवार्षिक वाढ (प्रमाण अंकात)*
१	१९०१	४,४२,९२४	-	-
२	१९११	५,३१,४४८	८८,५२४	१९.९९%
३	१९२१	४,३५,३१९	९६,१२१	१८.०९%
४	१९३१	५,७७,८०७	१,४२,४८८	३२.७३%
५	१९४१	६,५३,९९३	७६,१८६	१३.१९%
६	१९५१	७,१२,३८७	५८,३९४	८.९३%
७	१९६१	९,४०,०९१	२,२७,७०४	३१.९६%
८	१९७१	१२,३७,६६८	२,९७,५७७	३१.६५%
९	१९८१	१५,८५,८२८	३,४८,१६०	२८.१३%
१०	१९९१	२२,१३,७७९	६,२७,३५७	३९.५९
११	२००१	२८,९७,०१३	६,८३,२३४	३०.८६%
१२	२०११	३७,०१,२८२	८,०४,२६९	२७.७६%

स्त्रोत:-जनगणना अहवाल १९०१ ते २०११

*१९११ च्या ४,४२,९२४ लोकसंख्येने इतर सर्व लोकसंख्यांना वजा करून.

विश्लेषण:-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद जिल्ह्याची लोकसंख्या १९०१ यावर्षी ४,४२,९२४ होती ती २०११ यावर्षी १९.९९% वाढली; २०२१ मध्ये त्यात वाढ होण्याऐवजी घट झाली. ती घट ९६,१२१ इतकी होती. कारण २०११ ते २१ या काळात बालमृत्यूचे प्रमाण खूप जास्त होते. त्यानंतर २०११ पर्यंत लोकसंख्येमध्ये सतत वाढ होत

गेली. या वाढीचे दशवार्षिक प्रमाण बघितले असता १९९१ यावर्षी ३९.५९% होते. ते इतर दशवार्षिक वाढीपेक्षा खूप जास्त होते. २०११ मध्ये औरंगाबाद जिल्ह्याची लोकसंख्या ३७,०१,२८२ इतकी आहे. २००१ च्या तुलनेत त्यात ८,०४,२६९ म्हणजे २७.७६% ने वाढ झाली. २००१ ते २०११ यातील २०२१ हे दशक सोडले असता. इतर सर्व दशकांत लोकसंख्येमध्ये वाढ झाल्याचे दिसते. १९५१ यावर्षी लोकसंख्यावाढ थोडी मंदावलेली होती, तर १९६१ ते २०११ पर्यंत थोड्या फार फरकाने; परंतु सकारात्मक वाढ झाली.

१.३.५ औरंगाबाद जिल्ह्यातील धर्मानुसार लोकसंख्या सन २०११:-

सर्व समाजातील चालीरीती व परंपरा वेगळ्या असतात. त्यामुळे देशामध्ये काही गोष्टीत धर्मानुसार निर्णय घेतले जातात. लोकसंख्येचे विभाजन धर्मानुसार केले असता कोणत्या धर्मामध्ये लोकसंख्या वाढ कमी आहे; तसेच कोणत्या धर्मामध्ये लोकसंख्या वाढ जास्त आहेत, त्यानुसार निर्णय घेण्यासाठी धर्मानुसार लोकसंख्या माहित असणे आवश्यक आहे. म्हणून खालील तक्त्यामध्ये औरंगाबाद जिल्ह्याची धर्मानुसार लोकसंख्या दिलेली आहे.[९]

तक्ता क्र. १.३.५

औरंगाबाद जिल्हा धर्मानुसार लोकसंख्या सन २०११ (प्रमाण अंकात)

अ. क्र.	धर्म	स्त्री	पुरुष	एकूण	प्रमाण
१	हिंदू	१२,१५,४३६	१३,३०,००२	२५,४५,४३८	६८.७७%
२	मुस्लिम	३,८२,१७१	४,०४,५०६	७,८६,६७७	२१.२५%
३	बौद्ध	१,५०१,७१	१,५८,९२२	३,०९,०९३	८.३५%
४	जैन	१५,०६१	१५,९२०	३०,९८१	०.८४%
५	ख्रिश्चन	८,०७२	७,९१९	१५,९९१	०.४४%
६	शिख	२,३६१	२,७८१	५,१४२	०.१४%
७	धर्म न सांगितलेले	३,०६०	३,८१५	६,८७५	०.१९%
८	इतर	४८१	५२४	१,००५	०.०२%
९	एकूण सर्व धर्म	१७,७६,८१३	१९,२४,४६९	३७,०१,२८२	१००%

स्त्रोत:-जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद-२०२१-२२,

*३७०१२८२/१००= ३७०१२.८२ (२५४५४३८/३७०१२.८२= ६८.७७)

विश्लेषणः-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद जिल्ह्यात २०११ यावर्षी ३७,०१,२८२ इतकी लोकसंख्या आहे. त्यापैकी १७,७६,८१३ स्त्रिया व १९,२४,४६९ पुरुष आहे. औरंगाबाद जिल्ह्यात अनेक जाती धर्माचे लोक राहतात त्यामध्ये हिंदू, मुस्लिम, बौद्ध, जैन ख्रिश्चन, व शिख हे प्रमुख धर्म आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात हिंदू धर्माच्या लोकसंख्येची टक्केवारी ६८.७७% आहे. त्यामध्ये १२,१५,४३६ स्त्रिया व १३,३०,००२ पुरुष आहे. एकूण लोकसंख्येत मुस्लिम धर्म हा दुस-या क्रमांकावर असून त्याचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण २१.२५% असून स्त्रियांची संख्या ३,८२,१७१ तर पुरुषांची संख्या ४०,४५०६ इतकी आहे. बौद्ध धर्मातील लोकसंख्येचे प्रमाण ८.३५% असून स्त्रियांची संख्या १,५०,१७१ व पुरुषांची संख्या १,५८,९२२ इतकी आहे. त्याचप्रमाणे जैन धर्मातील लोकसंख्येचे प्रमाण ०.८४%, ख्रिश्चन ०.४४% शिख ०.१४% इतकी लोकसंख्या आहे. जनगणनेत धर्म न सांगितलेल्या लोकांची संख्या एकूण लोकसंख्येच्या ०.१९% प्रमाणात आहे, तर इतर धर्माची लोकसंख्या ०.०२% इतकी आहे. जैन धर्मामध्ये स्त्री-पुरुषांच्या प्रमाणात जास्त फरक जाणवत नाही.

१.३.६ औरंगाबाद जिल्ह्यातील तालुका निहाय लोकसंख्याः-

औरंगाबाद जिल्ह्यात एकूण नऊ तालुके आहे. खालील तक्त्यामध्येवर्ष २००१ वर्ष २०११ नुसार तालुका निहाय लोकसंख्या व त्यातील फरक दिलेला आहे.[१०]

तक्ता क्र. १.३.६

औरंगाबाद जिल्ह्यातील तालुका निहाय लोकसंख्या दशवार्षिक वाढ (प्रमाण अंकात)

अ. क्र.	तालुका	वर्ष २००१ अ	वर्ष २०११ ब	दशवार्षिक वाढ (प्रमाण टक्केवारी मध्ये)
१	औरंगाबाद	११,६५,५८७	१५,९०,३७४	३६.४४%
२	खुलताबाद	१,०१,५००	१,१८,३२८	१६.८७%
३	कन्नड	२,९१,२६७	३,४१,०१९	१६.८७%
४	सोयगाव	९०,१२२	१,१३,०८७	२५. ४८%
५	पैठण	२,८७,३५६	३,४७,९७३	२१.०९%
६	वैजापूर	२,५९,६०१	३,११,३७१	१९.९४%
७	गंगापूर	२,७९,१९७	३,५८,१५५	२८.२८%
८	फुलंब्री	१,३१,३२७	१,६१,०१२	२२.६०%
९	सिल्लोड	२,९१,०५६	३,५९,९६३	२३.६७%
	एकूण	२८,९७,०१३	३७,०१,२८२	२७.७६%

स्त्रोत:- http:-//www.census2011.co.in

अधिकृत माहितीच्या आधारे संशोधकाने तयार केलेले

११,६५,५८७/१००=११६५५.८७) (१५,९०,३७४/११६५५.८७=३६.४४%

विश्लेषणः-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद जिल्ह्यात २००१ यावर्षी एकूण लोकसंख्या २८,९७,०१३ होती, तर २०११ मध्ये त्यात २७.७६% ने वाढ होऊन एकूण लोकसंख्या ३७,०१,२८२ इतकी झाली. औरंगाबाद जिल्ह्यातील नऊ तालुक्यांपैकी सर्वात जास्त लोकसंख्या औरंगाबाद तालुक्यातील असून, वर्ष २००१ नुसार एकूण लोकसंख्या ११,६५,५८७ होती, त्यात ३६.४४% ने वाढ होऊन २०११ यावर्षी १५,९०,३७४ झाली. लोकसंख्येत कन्नड तालुका दुस-या क्रमांकावर असून २००१ यावर्षी कन्नड तालुक्यातील लोकसंख्या २९१२६७ इतकी होती, त्यात १६.८७% ने वाढ होऊन ३,४१,०१९ इतकी झाली. लोकसंख्येच्या वाढीमध्ये सर्वात कमी लोकसंख्या वाढ खुलताबाद तालुक्यातील असून या तालुक्यात २००१ यावर्षी एकूण लोकसंख्या १०१५०० इतकी होती, त्यात १६.८७% ने वाढ होऊन ती १,१८,३२८ इतकी झाली. कन्नड तालुक्यामधील लोकसंख्येची वाढ १६.८७% आहे; परंतु कन्नड तालुक्याची एकूण लोकसंख्या खुलताबाद तालुका पेक्षा

जास्त आहे. सोयगाव तालुक्यामध्ये २००१ नुसार लोकसंख्या ९०,१२२ इतकी होती, त्यात २०११ यावर्षी २५.४८% ने वाढ होऊन ती ११३०८७ इतकी झाली. औरंगाबाद जिल्ह्यातील लोकसंख्यावाढीची सरासरी २०.६४% आहे.

१.३.७ औरंगाबाद जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी स्त्री-पुरुष प्रमाणः-

कोणत्याही देशाचा किंवा राज्याचा स्त्री-पुरुष प्रमाण समान असणे आवश्यक आहे. त्यामध्ये खूप जास्त फरक असेल, तर त्याचे समाजावर अनेक विपरीत परिणाम पडतात. खालील तक्त्यामध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी स्त्री-पुरुष प्रमाण दिलेले आहे.[११]

तक्ता क्र. १.३.७
ग्रामीण व नागरी स्त्री-पुरुष प्रमाण

अ.क्र.	वर्ष	ग्रामीण अ	नागरी ब	एकूण
१	१९६१	९७०	८७४	९५५
२	१९७१	९५८	८३४	९३५
३	१९८१	९५८	८७२	९३६
४	१९९१	९४१	८८४	९२२
५	२००१	९३६	९०५	९२४
६	२०११	९२४	९२३	९२३

स्त्रोत:- http:-//www.census2011.co.in
अधिकृत माहितीच्या आधारे संशोधकाने तयार केलेले.

विश्लेषणः-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद जिल्ह्यात १९६१ यावर्षी ग्रामीण स्त्री-पुरुष प्रमाण ९७० व नागरी स्त्री-पुरुष प्रमाण ८७४ तर एकूण सरासरी ९५५ होती. या आकडेवारीनुसार १९६१ वर्षे ग्रामीण विभागात स्त्रियांची संख्या शहरापेक्षा ९६ ने जास्त होती, तर १९७१ यावर्षी ग्रामीण विभागात स्त्रियांची संख्या ९५८, नागरी विभागात ८३४ एकूण सरासरी ९३५ इतकं स्त्री-पुरुष प्रमाण होतं. यातील फरक १२४ होते, म्हणजे ग्रामीण भागात महिलांची संख्या जास्त होती. १९६१ ते १९९१ पर्यंत ग्रामीण आणि शहरी विभागातील स्त्री-पुरुष प्रमाणामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत दिसते; परंतु २००१ ते २०११

यावर्षी दोघातील अंतर कमी झाल्याचे दिसते. २०११ यावर्षी ग्रामीण भागातील स्त्री-पुरुष प्रमाण ९२४ तर नागरी भागात २२३ इतके होते. दोघातील अंतर एक होतं. यावरून आपल्याला असे दिसते की, २००१ नंतर स्त्री-पुरुष प्रमाणातील तफावत कमी होत गेली परंतु या संख्यामध्ये अजून जास्त बदल होण्याची आवश्यकता आहे. स्त्री-पुरुष यांचे प्रमाण व्यस्त असेल, तर समाजामध्ये अनेक समस्या निर्माण होतात. व त्याचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष संबंध विकासाशी असतो, म्हणून स्त्री-पुरुष प्रमाण समान होण्यासाठी प्रयत्नांची आवश्यकता आहे.

१.३.८ औरंगाबाद जिल्ह्यातील अनुसूचित जाती जमातीच्या लोकसंख्येची तहसिल निहाय टक्केवारीः-

अनुसूचित जाती-जमाती आदिवासी हे भारताच्या ऐतिहासिकदृष्ट्या वंचित लोक होते भारताच्या राज्यघटनेने मान्य केलेले भारतीय उपखंडावर राज्य करणा-या ब्रिटिश सत्तेच्या काळात ते डिप्रेस्ड क्लास मागास वर्ग म्हणून ओळखले जात होते. आधुनिक साहित्यात अनुसूचित जातींचा उल्लेख कधी कधी आदि-द्रविड म्हणून होतो. २०११ च्या भारतीय जनगणनेनुसार, भारताच्या एकूण लोकसंख्येत अनुसूचित जातींच्या आणि अनुसूचित जमातींच्या लोकांचे प्रमाण अनुक्रमे १६.६% आणि ८.६% आहे. या दोन समूहांची एकत्रित लोकसंख्या ही २५.२% ३१ कोटी आहे, जर ही संख्या एक देश म्हणून गृहीत धरली चीन, भारत व अमेरिका ह्यांनंतर जगातला चौथा सर्वात मोठा देश ठरू शकतो. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताच्या संविधानाद्वारे या मागास समजल्या जाणा-या समूहांना आरक्षण लागू करण्यात आले. खालील तक्त्यामध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील अनुसूचित जाती-जमातीच्या लोकसंख्येची तहसील निहाय टक्केवारी दिलेली आहे.[१२]

तक्ता क्र. १.३.८

अनुसूचित जाती जमाती (प्रमाण टक्क्यात)

अ.क्र.	विभाग	अनुसूचित जाती अ	अनुसूचित जमाती ब	एकूण अ,ब
१	सोयगाव	१०.३३	१३.७५	२४.०८
२	गंगापूर	१५.९२	४.१२	२०.०४
३	औरंगाबाद	१८.२२	१.५५	१९.७७
४	वैजापूर	१३.३६	५.९४	१९.३
५	सिल्लोड	९.०१	७.७३	१६.७४
६	पैठण	१३.९५	२.३	१६.२५
७	कन्नड	८.७७	७.१४	१५.९१
८	खुलताबाद	१०.३२	५.५५	१५.८७
९	फुलंब्री	१०.०१	१.९७	११.९८

स्त्रोत:- http://www.census2011.co.in

विश्लेषण:-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, सोयगाव तालुक्यामध्ये अनुसूचित जातींची लोकसंख्या १०.३३% इतकी आहे, तर अनुसूचित जमातींची लोकसंख्या १३.७५% इतकी आहे. औरंगाबाद तहसीलमध्ये अनुसूचित जमातींची लोकसंख्या १८.२२% तर अनुसूचित जमातींची लोकसंख्या १.५५% इतकी आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील सर्वात जास्त अनुसूचित जातींची लोकसंख्या औरंगाबाद शहरात आहे, तर दुस-या क्रमांकावर गंगापूर मध्ये आहे. गंगापूर तहसीलमधील अनुसूचित जातींची लोकसंख्या १५.९२% इतकी आहे, तर सर्वात कमी अनुसूचित जातींची लोकसंख्या ८.७७% कन्नड तहसीलमध्ये आहे. अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येत सोयगाव हा तालुका प्रथम क्रमांकावर आहेत. सोयगाव तहसिलातील अनुसूचित जमातींची लोकसंख्या १३.७५% तर दुस-या क्रमांकावरील वैजापूर तहसीलमधील अनुसूचित जमातींची लोकसंख्या ५.९४% इतकी आहे. औरंगाबाद शहरामध्ये अनुसूचित जमातींची संख्या सर्वात कमी असून ती ४.१२% आहे. अनुसूचित

जमाती व अनुसूचित जाती याचा एकंदरीत विचार केला असता सोयगाव तालुक्यात ही लोकसंख्या सर्वात जास्त असून ती २४.०८% इतकी आहे, तर सर्वात कमी लोकसंख्या फुलंब्री तालुक्यात असून ती ११.९८% इतकी आहे.

१.३.९ औरंगाबाद जिल्हा ग्रामीण व नागरी लोकसंख्या सन २०११:-

ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये लोकसंख्या वाढीची किंवा कमी होण्याची कारणे वेगवेगळी असतात. त्या कारणानुसार त्यावर उपाययोजना करता यावी म्हणून खालील तक्त्यामध्ये औरंगाबाद जिल्ह्याची ग्रामीण व नागरी लोकसंख्या दिलेली आहे.[१३]

तक्ता क्र. १.३.९

औरंगाबाद जिल्हा ग्रामीण व नागरी लोकसंख्या सन २०११

अ. क्र.	औरंगाबाद जिल्हा	ग्रामीण	नागरी
१	लोकसंख्या % मध्ये	५६.२३%	४३.७७%
२	एकूण लोकसंख्या	२०,८१,११२	१६,२०,१७०
३	पुरुष लोकसंख्या	१०,८१,८२५	८,४२,६४४
४	स्त्री लोकसंख्या	९,९९,२८७	७,७७,५२६
५	लिंग गुणोत्तर	९२४	९२३
६	बाल लिंग गुणोत्तर	८५१	८६७
७	बाल लोकसंख्या ० ते सहा वयोगटातील	३,०६,३६४	२,२६,२९५
८	मुले ० ते सहा वयोगट	१,६५,५१०	१,६५,५१०
९	मुली ० ते सहा वयोगटातील	१,४०,८५४	-
१०	बाल लोकसंख्येचे प्रमाण	१४.७२%	१३.९७%
११	मुलांचे प्रमाण	१५.३०%	१४.३८%
१२	मुलींचे प्रमाण	१४.१०%	१३.५२%
१३	साक्षर लोकसंख्या	१२,९३,३३०	१२,१०,५०७
१४	पुरुष साक्षरता	७,६८,४११	६,६२,५२५
१५	स्त्री साक्षरता	५,२४,९१९	५,४७,९८२
१६	साक्षरता% मध्ये	७२.८७%	८६.८४%
१७	पुरुष साक्षरता मध्ये	८३.८६%	९१.८३%
१८	स्त्री साक्षरता मध्ये	६१.१५%	८१.४९%

स्त्रोतः- http:-//www.census2011.co.in/census/district/353_aurangabad.html/

विश्लेषणः-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी ५६.२३% लोकसंख्या ग्रामीण भागात राहते व ४३.७७% लोकसंख्या नागरी भागांमध्ये राहते. त्यामध्ये ग्रामीण भागातील पुरुष लोकसंख्या १०,८१,८२५ तर नागरी लोकसंख्या ८,४२,६४४ इतकी आहे. स्त्री लोकसंख्येमध्ये ग्रामीण भागात ९,९९,२८७ स्त्रिया राहतात, तर नागरी भागामध्ये ७,७७,५२६ स्त्रिया राहतात. औरंगाबाद जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर प्रमाणानुसार ग्रामीण भागातील लिंग गुणोत्तर प्रमाण ९२४ असून नागरी भागात ९२३ इतके आहे. तुलनेने ग्रामीण भागातील लिंग गुणोत्तर जास्त आहे, तर बाल लिंग गुणोत्तराचे प्रमाण ग्रामीण भागात ८५१ असून नागरी भागात ८६७ इतके आहे. बाल लोकसंख्या ० ते ६ वयोगटातील लोकसंख्येत ग्रामीण भागात ३,०६,३६४ तर नागरी भागात २,२६,२९५ बालके राहतात, त्यात ० ते ६ वयोगतातील मुले नागरी भागात १,६५,५१० व शहरी भागात १,६५,५१० इतके राहतात. ० ते ६ वयोगटातील मुलींमध्ये ग्रामीण भागात १,४०,८५४ तर नागरी भागात १,०५,०८४ इतक्या राहतात. बाल लोकसंख्येचे प्रमाण ग्रामीण भागामध्ये १४.७२% असून नागरी भागात १३.९७% इतके आहे. यात ग्रामीण भागातील लोकसंख्येचे प्रमाण जास्त आहे. एकूण मुलांच्या प्रमाणात नागरी भागातील मुलांचे प्रमाण १५.३०% तर नागरी भागात हे प्रमाण १४.३८% इतके आहे. शहरी भागातील मुलींचे प्रमाण १३.५२% असून ग्रामीण भागात हे प्रमाण १४.१०% आहे. एकूण साक्षरतेत ग्रामीण भागाचे प्रमाण जास्त असून पुरुष साक्षरते पैकी ७,६८,४११ इतकी लोकसंख्या ग्रामीण भागातील असून ६,६२,५२५ इतकी लोकसंख्या नागरी भागातील आहे, तर ग्रामीण भागातील स्त्रियांची साक्षर लोकसंख्या ५,२४,९१९ असून नागरी भागातील ५,४७,९८२ इतकी आहे. साक्षरतेच्या एकूण टक्केवारीत नागरी भागातील साक्षरतेचे प्रमाण जास्त असून ते ८६.८४% आहे, तर ग्रामीण भागातील साक्षरतेचे एकूण प्रमाण ७२.८७% इतके आहे.

१.३.१० औरंगाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय स्त्री-पुरुष लोकसंख्येचे लिंग गुणोत्तर प्रमाणः-

लिंग गुणोत्तर हे लोकसंख्येमधील पुरुष व स्त्रियांचे गुणोत्तर आहे. जगात सर्वसाधारणपणे पुरूष व स्त्रियांचे प्रमाण १:१ असे अपेक्षित असले तरीही प्रत्येक देशात हे गुणोत्तर वेगळे आढळते. भारतात स्त्रियांची घटणारी संख्या चिंतेची बाब झाली आहे. २०११ सालच्या जनगणना अहवालानुसार भारतात १००० पुरुषांमागे ९४० स्त्रिया आहेत. म्हणजेच लिंग गुणोत्तर ९४० आहे.

लिंग गुणोत्तर सूत्र=स्त्री संख्या/पुरुष संख्या x १०००

काही राज्यांची लिंग-गुणोत्तरे केरळ १०८४, तामिळनाडू ९९६, महाराष्ट्र ९२९, पंजाब ८९५, दिल्ली ८६८ औरंगाबाद जिल्ह्याचे लिंग गुणोत्तराचा अभ्यास करण्यासाठी खालील तक्ता दिलेला आहे.[१४]

तक्ता क्र. १.३.१०
औरंगाबाद जिल्हा तालुकानिहाय स्त्री-पुरुष लोकसंख्या लिंग गुणोत्तर

अ. क्र.	तालुका	एकूण २०११	स्त्री २०११	पुरुष २०११	लिंग गुणोत्तर २०११
१	औरंगाबाद	१५,९०,३७४	७,६१,४०३	८,२८,९७१	९१८
२	खुलताबाद	१,१८,३२८	५७,१०३	६१,२२५	९३३
३	कन्नड	३,४१,०१९	१,६३,०६२	१,७७,८४३	९२०
४	सोयगाव	१,१३,०८७	५४,१९१	५८,८९६	९२०
५	पैठण	३,५९,९६३	१,७२,९४०	१,८७,०२३	९२६
६	वैजापूर	१,६१,०१२	७७,४२१	७७,४२१	९२६
७	गंगापूर	३,११,३७१	१,५०,५४५	१,६०,८२६	९३६
८	फुलंब्री	३,११,३७१	१,७१,५९८	१,८६,५५७	९२०
९	सिल्लोड	३,११,३७१	१,६८,२३३	१,७९,७४०	९३६
	एकूण (महाराष्ट्र)	३७,०१,२८२	१७,७६,८१३	१९,२४,४६९	९२३

स्त्रोतः-अधिकृत माहितीच्या आधारे संशोधकाने तयार केलेले.
http://www.census2011.co.in.

विश्लेषणः-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद तालुक्याची एकूण लोकसंख्या १५,९०,३७४ इतकी होती, त्यात पुरुषांची संख्या ८,२८,९७१ व स्त्रियांची संख्या ७,६१,४०३ इतकी होती. २००१ नुसार औरंगाबाद तालुक्याचे लिंग गुणोत्तर प्रमाण ९०३ होते, त्यात सुधार होऊन २०११ यावर्षी ९१८ झाले. औरंगाबाद जिल्ह्यातील सर्व तालुक्यात पैकी वैजापूर तालुक्याचे स्त्री-पुरुष प्रमाण २००१ च्या लोकसंख्येनुसार ९५१ इतके होते. इतर तालुक्याच्या तुलनेत हे प्रमाण सर्वात जास्त होते. औरंगाबाद तालुक्याचे स्त्री-पुरुष प्रमाण सर्वात कमी फक्त ९०३ होते. या आकडेवारीत वाढ होऊन २०११ यावर्षी गंगापूर तालुक्यातील स्त्री-पुरुष प्रमाण ९३६ झाले. त्याचबरोबर २००१ यावर्षी सिल्लोड तालुक्याचे प्रमाण ९४८ होते. ते २०११ यावर्षी ९३६ झाले. गंगापूर आणि सिल्लोड तालुक्यात २००१ च्या तुलनेत स्त्री-पुरुष प्रमाण घटले; परंतु इतर तालुक्यांच्या प्रमाणात गंगापूर आणि सिल्लोड तालुक्याचे प्रमाण जास्त आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा अभ्यास केला असता २००१ या तुलनेत सर्वच तालुक्यामध्ये स्त्री-पुरुष प्रमाणात घट झाल्याचे दिसते. विशेष करून औरंगाबाद तालुका २००१ यावर्षी स्त्री-पुरुष प्रमाणातील क्रमवारीत सर्वात शेवटी होता व २०११ यावर्षी देखील तो सर्वात शेवटीच आहे.

१.३.११ औरंगाबाद जिल्ह्यातील तालुका निहाय साक्षरताः-

साक्षरता म्हणजे केवळ लिहिता वाचता येणे इतकाच अर्थ अभिप्रेत नाहृ. तर एखाद्या विशिष्ट उद्दिष्टासाठी वा ज्ञानार्जनासाठी लिपीचा उपयोग करण्याची कार्यक्षमता म्हणजे साक्षरता होय. साक्षरता ही दोन प्रकारे व्यक्त केली जाते. साक्षरता या स्वरूपात, म्हणजे साक्षरतेचा वापर शिकलेल्या लिपीचा वापर विविध कामकाजात करणे आणि अभिजन साक्षरता म्हणून आपले मत व्यक्त करणे, साक्षरतेवर क्षेत्राचा विकास अवलंबून असतो. म्हणून औरंगाबाद जिल्ह्याची साक्षरता खाली दिलेली आहे.[१५]

तक्ता क्र. १.३.११

औरंगाबाद जिल्ह्यातील तालुका निहाय साक्षरतेची टक्केवारी

अ. क्र.	तालुका	१९९१ अ	२००१ ब	२०११ क	वाढ वाढ १९९१-२००१ (ब-अ)	२००१-२०११ (क-ब)
१	औरंगाबाद	६७.६९	८०.३०	८६.५७	१२.६१%	६.२७%
२	खुलताबाद	५१.८३	६८.८०	७५.३५	१६.९७%	६.५५%
३	कन्नड	५०.५५	६८.८०	७५.४	१८.२५%	६.६४%
४	सोयगाव	४८.०३	६५.१०	७३.००	१७.०७%	७.९०%
५	सिल्लोड	४४.३०	६६.१०	७३.९७	२१.०८%	७.८७%
६	फुलंब्री	---	६६.२०	७४.१४	---	७.९४%
७	वैजापूर	५७.४९	७०.८०	७७.७४	१३.३१%	६.९४%
८	गंगापूर	५२.४८	६९.१०	७७.९६	१६.६२%	८.८६%
९	पैठण	५०.४८	६६.५०	७५.०७	१६.०२	८.५७
	एकूण जिल्हा	५२.८१	६९.०७	८०.४०	१६.२६	११.३६

स्त्रोत:- http:-//www.census2011.co.in
अधिकृत माहितीच्या आधारे संशोधकाने तयार केलेले.

विश्लेषण:-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद तालुक्याची साक्षरता १९९१ यावर्षी ६७.६९% इतकी होती. ती वाढून २०११ यावर्षी ८६.५७% इतकी झाली. १९९१ ते २००१ या कालावधीमध्ये साक्षरतेचे प्रमाण १२.६१% इतके वाढले, तर २००१ ते २०११ या कालावधीमध्ये साक्षरतेत ६.२७% इतकी वाढ झाली. औरंगाबाद जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा विचार केला असता. १९९१ ते २०२१ या कालावधीत सिल्लोड तालुक्याची साक्षरता २१.०८% इतकी असल्याचे दिसते. तुलनात्मक दृष्ट्या ते इतर तालुक्यापेक्षा जास्त आहे; परंतु २००१ ते २०११ या कालावधीत गंगापूर या शहराची साक्षरता ८.८६% इतकी होती. तुलनात्मक दृष्ट्या औरंगाबाद तालुक्याची साक्षरता इतर तालुक्याच्या मानाने कमी असल्याचे दिसते. एकंदरीत विचार केला असता औरंगाबाद जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण सतत वाढत गेल्याचे दिसते; परंतु झालेली वाढ ही इतर जिल्हा पेक्षा कमी आहे कारण

मुंबई जिल्ह्याची साक्षरता ८९.९१% तर नागपूर जिल्ह्याची साक्षरता ८८.३९% इतकी आहे. त्या तुलनेने औरंगाबाद जिल्ह्याची साक्षरता ७९.०२% इतकी आहे. साक्षरता क्रमवारीत महाराष्ट्रात औरंगाबाद जिल्ह्याचा २२ क्रमांक लागतो.

१.३.१२ औरंगाबाद जिल्ह्यातील साक्षरतेची प्रवृत्तीः-

भारत देशाची लोकसंख्या सतत वाढत आहे. त्याचप्रमाणे आपल्या शहराची लोकसंख्या देखील वाढत आहे. म्हणून साक्षरतेची वाढ संख्येनुसार जास्त दिसते. त्याचा बारकाईने अभ्यास करण्यासाठी साक्षरता दरातील प्रवृत्तीचा अभ्यास करणे आवश्यक असते; म्हणून खालील तक्त्यामध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील साक्षरतेची प्रवृत्ती दिलेली आहे.[१६]

तक्ता क्र. १.३.१२
औरंगाबाद जिल्ह्यातील साक्षरतेची प्रवृत्ती (प्रमाण टक्क्यात)

अ.क्र.	वर्ष	पुरुष साक्षरता अ	स्त्रियांची साक्षरता ब	सरासरी अअब/२
१	१९६१	२९	७	१८
२	१९७१	४४	१५	३०
३	१९८१	५३	२३	३८
४	१९९१	७३	४०	५७
५	२००१	८५	६०	७२.९
६	२०११	८७.३७	७०.०८	७९.०२

स्त्रोतः-अधिकृत माहितीच्या आधारे संशोधकाने तयार केलेले.
http:-//www.census2011.co.in

विश्लेषणः-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, १९६१ यावर्षी औरंगाबाद जिल्ह्याची एकूण सरासरी १८% होती. त्यामध्ये पुरुषांचे प्रमाण २९% तर स्त्रियांचे प्रमाण ७% होते, तर २०११ मध्ये ते प्रमाण वाढून ७९.०२% झाले, त्यात पुरुषांचे प्रमाण ८७.३७% तर स्त्रियांचे प्रमाण ७०.०८% इतके होते. १९६१ ते २०११ या कालावधीमध्ये स्त्री-पुरुष साक्षरता दरांमध्ये सतत वाढ झाल्याचे दिसते; परंतु सुरुवातीच्या काळामध्ये वाढीचा दर हा पुरुषांचा जास्त होता, तर स्त्रियांचा खूप कमी होता. त्यामागचे मूळ कारण म्हणजे समाजाचा

स्त्रियांच्या कडे पाहण्याचा दृष्टिकोन नकारात्मक होता. परंतु हळूहळू त्यामध्ये सुधारणा झाली. व स्त्रियांचे शैक्षणिक प्रमाण वाढू लागले; परंतु आज देखील औरंगाबाद जिल्ह्यामध्ये १२.६३% पुरुष, तर २९.९२% स्त्रिया निरक्षर आहे.

१.३.१३ औरंगाबाद जिल्ह्यातील क्षेत्रानुसार साक्षरतेचे प्रमाणः-

साक्षरता ही ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये वेगवेगळी असते, त्याचप्रमाणे साक्षरता कमी किंवा जास्त होण्याची कारणे देखील वेगळी असतात; म्हणून नेमक्या कोणत्या भागामध्ये साक्षरता कमी आहे व कोणत्या भागामध्ये साक्षरता जास्त आहेत, यासाठी औरंगाबाद जिल्ह्याचे भागानुसार साक्षरतेचे प्रमाण खालील तक्त्यामध्ये दिलेले आहे.[१७]

तक्ता क्र.१.३.१३

औरंगाबाद जिल्ह्यातील क्षेत्रानुसार साक्षरतेचे प्रमाण

अ.क्र.	क्षेत्र	औरंगाबादा जिल्हा अ	ब	फरक ब-अ
१	ग्रामीण	७२.८७	७७.०१	४.१४
२	नागरी	८६.८४	८८.६९	१.८५
३	एकूण	७९.०२	८२.३४	३.३२
४	पुरुष	८७.३७	८८.३८	१.०१
५	स्त्रिया	७०.०८	७५.८७	५.७९
६	साक्षरते मध्ये महाराष्ट्राचा देशात क्रमांक	२२	९	९
७	दारिद्र्य रेषे खालील ग्रामीण कुटुंबे२००२ नुसार	१.१ लाख	४५.१९ लाख	-

स्त्रोतः- http://www.census2011.co.in

वश्लेषणः-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, ग्रामीण व नागरी साक्षरतेमध्ये औरंगाबाद जिल्ह्याची ग्रामीण साक्षरता ७२.८७% तर महाराष्ट्राची ग्रामीण साक्षरता ७७.०१% इतकी आहे. दोघातील ४.१४% इतका फरक आहे, तर नागरी साक्षरतेमध्ये जिल्ह्याची साक्षरता ८६.८४% तर महाराष्ट्राची साक्षरता ८८.६९% इतकी आहे. दोघातील फरक १.८५% आहे. तुलनात्मक दृष्ट्या औरंगाबाद जिल्ह्याचे ग्रामीण आणि नागरी साक्षरता प्रमाण कमी

आहे, त्यात केवळ पुरुषांचा विचार केला असता, औरंगाबाद जिल्ह्यातील पुरुष साक्षरता प्रमाण ८७.३७% तर महाराष्ट्र राज्यातील साक्षरता प्रमाण ८.३८% आहे. दोघातील फरक १.०१% आहे. स्त्रियांचे जिल्ह्यातील साक्षरता प्रमाण ७०.०८% असून महाराष्ट्रात ७५.८७% इतकी आहे. दोघांतील फरक ५.७९% इतका आहे. पुरुष आणि स्त्रियांचा एकत्रित विचार केला असता महाराष्ट्र राज्य आणि औरंगाबाद जिल्हा साक्षरता प्रमाणात स्त्रियांचे प्रमाण खूप कमी आहे. आंतरराज्य तुलना केली असता साक्षरते मध्ये औरंगाबाद जिल्ह्याचा क्रमांक २२ लागतो, तर महाराष्ट्र राज्याचा क्रमांक १२ लागतो.

१.३.१४ औरंगाबाद जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षणः-

खालील तक्त्यामध्ये महाराष्ट्र व औरंगाबाद जिल्ह्यातील प्राथमिक शाळा, विद्यार्थी व शिक्षकांची माहिती दिलेली आहे.

तक्ता क्र. १.३.१४
औरंगाबाद जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण वर्ग १ ते ८

अ.क्र.	घटक	विभाग	जिल्हा	महाराष्ट्र	जिल्हा	महाराष्ट्र
		वर्ष	२०१९-२०	२०१९-२०	२०२०-२१	२०२०-२१
१	एकूण शाळा	संख्या	३,३०४	१,०६,४९१	३१८१	१,०६,३३८
२	विद्यार्थी	हजार	५०१	१५,६९४	४८७	१५,३९१
३	शिक्षक	हजार	१९	५३३	१८	५१२
४	विद्यार्थी-शिक्षक प्रमाण	संख्या	२६.६	२९.४	२८	३०.१

स्त्रोतः-जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद-२०२१-२२

विश्लेषणः-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, प्राथमिक शिक्षण १ ते ८ बाबतीत औरंगाबाद जिल्ह्यामध्ये १९१९-२० यावर्षी एकूण शाळांची संख्या ३,३०४ व विद्यार्थी संख्या ५०१ हजार, तर शिक्षक १९ हजार होते. त्याच यावर्षी जिल्ह्यातील शिक्षक-विद्यार्थी प्रमाण २६.६% इतके होते, तर महाराष्ट्रात २०१९-२० यावर्षी शाळांची संख्या १,०६,४९१, विद्यार्थी संख्या १५,६९४ हजार व शिक्षकांची संख्या ५३३ हजार इतकी होती, तर विद्यार्थी

शिक्षकांचे प्रमाण २९.४ इतके होते. ते कमी होऊन २०२०-२१ यावर्षी एकूण शाळेची संख्या ३,१८१, विद्यार्थी संख्या ४८७ हजार व शिक्षक संख्या १८ हजार इतकी झाली, तर विद्यार्थी-शिक्षक प्रमाण २८ झाले; परंतु महाराष्ट्र राज्यात एकूण शाळा, विद्यार्थी, शिक्षक व विद्यार्थी-शिक्षक प्रमाण यात वाढ झाल्याची दिसते.

१.३.१५ औरंगाबाद जिल्ह्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण:-

खालील तक्त्यामध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, विद्यार्थी संख्या त्याचप्रमाणे महाराष्ट्र व औरंगाबाद जिल्ह्यातील शिक्षकांचे प्रमाण याविषयी माहिती दिलेली आहे.[१९]

तक्ता क्र. १.३.१५
औरंगाबाद जिल्ह्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा (प्रमाण अंकात)

अ.क्र.	घटक	विभाग	जिल्हा	महाराष्ट्र	जिल्हा	महाराष्ट्र
		वर्ष	२०१९-२०	२०१९-२०	२०२१-२२	२०२०-२१
१	एकूण शाळा	संख्या	१,२५१	२८,०९३	१,२६०	२८,५०५
२	विद्यार्थी	हजार	४५९	६,४८१	४४३	६,५२४
३	शिक्षक	हजार	१४	२५१	१४	२४८
४	विद्यार्थी-शिक्षक प्रमाण	संख्या	३३	२५.८	३३	२६.३

स्त्रोत:-जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद-२०२१-२२

विश्लेषण:-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद जिल्ह्यात २०१९-२० यावर्षी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची संख्या १२५१, विद्यार्थी संख्या ४५९ हजार, शिक्षकांची संख्या १४ हजार व विद्यार्थी-शिक्षकांचे प्रमाण ३३ होते. त्याच यावर्षी महाराष्ट्रात एकूण शाळांची संख्या २८,०९३, विद्यार्थी संख्या ६,४८१ व शिक्षकांची संख्या २५१ होती, तर विद्यार्थी-शिक्षकांचे प्रमाण ३३ होते. २०२०-२१ यावर्षी महाराष्ट्रात एकूण

शाळांची संख्या २८,५०५, विद्यार्थी संख्या ६,५२४, शिक्षक संख्या २४८ व विद्यार्थी-शिक्षक प्रमाण २६.३ इतके होते. २०१९-२० या वर्षाच्या तुलनेत २०२१-२२ यावर्षी जिल्ह्यात एकूण नऊ शाळांची संख्या वाढली; परंतु विद्यार्थी संख्या कमी झाली शिक्षकांची संख्या अगोदर एवढीच आहे. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या वाढणे अपेक्षित होते; परंतु प्राथमिक शाळेतील गळतीचे प्रमाण अधिक वाढल्यामुळे माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली आहे.

१.३.१६ औरंगाबाद जिल्ह्यातील उच्च शिक्षणः-

उच्च शिक्षण म्हणजे काय? उच्च शिक्षणाचा विचार करते वेळी आपल्याला प्रमुख्याने दोन गोष्टी विचारात घ्याव्या लागतात. एक म्हणजे उच्च शिक्षणाची पातळी आणि दुसरे म्हणजे विषय, पातळीचा विचार म्हणजे उच्च शिक्षण हे पदवीपूर्व व पदव्युत्तर संशोधनपर की संशोधन आहे या अंगाने विचार करता येईल दुसरं म्हणजे उच्च शिक्षणासाठी असलेल्या पूरक शाखांचा म्हणजेच कला, विज्ञान, वाणिज्य, उद्योग व्यवस्थापन, वैद्यकीय आणि कायदा इत्यादींचा विचार करता येईल, त्याचप्रमाणे उच्च शिक्षण हे दोन भागात विभागले गेले आहे सर्वसाधारण आणि व्यवसायिक, औरंगाबाद शहरामध्ये विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार शिक्षण व्यवस्था आहे किंवा नाही त्यासाठी खालील तक्ता दिलेला आहे.[२०]

तक्ता क्र. १.३.१६
औरंगाबाद जिल्ह्यातील उच्च शिक्षण संस्था (प्रमाण अंकात)

अ.क्र.	घटक	विभाग	जिल्हा	महाराष्ट्र	जिल्हा	महाराष्ट्र
		वर्ष	२०१९-२०	२०२०-२१	२०२१-२२	२०२१-२२
१	संस्था	संख्या	११४	३,७८४	११४	३,८५६
२	एकूण विद्यार्थी	हजार	१९४	७३८	१५६	८९६

स्त्रोतः-जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद-२०२१-२२

विश्लेषण:-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद जिल्ह्यात २०१९-२० यावर्षी एकूण ११४ संस्था होत्या. २०२१ मध्ये यात एकाही संस्थेची भर पडली नाही; परंतु विद्यार्थी संख्या १९४ हजारावरुन १५६ हजार झाली, तर महाराष्ट्रात २०२०-२१ यावर्षी एकूण संस्थेची संख्या ३,७८४ होती ती २०२१-२२ मध्ये ३,८५६ इतकी झाली, तर विद्यार्थी संख्या ७३८ वरून ८९६ इतके झाली. औरंगाबाद जिल्ह्याच्या तुलनेत महाराष्ट्रातील शिक्षण संस्थांची संख्या वाढली व विद्यार्थी संख्याही वाढली; परंतु औरंगाबाद जिल्ह्याची विद्यार्थी संख्या वाढण्याऐवजी कमी झाली कारण बहुतेक विद्यार्थी औरंगाबाद सोडून इतर शहरांमध्ये उच्च शिक्षणासाठी गेले.

१.३.१७ औरंगाबाद जिल्ह्यातील तांत्रिक व व्यवसाय शिक्षण:-

आधुनिक काळात विज्ञानाचा व्यावहारिक उपयोग करून समाजोपयोगी व्यवसायांचे तंत्रज्ञान देणा-या शिक्षणाला तांत्रिक शिक्षण असे म्हणता येईल. तंत्रज्ञानाबरोबर मानव्यविद्येचे सर्वसाधारण ज्ञानही आधुनिक तांत्रिक शिक्षणक्रमात समाविष्ट असते. औरंगाबाद जिल्ह्यामध्ये तांत्रिक व व्यवसाय शिक्षणाची माहिती खालील तक्त्यात दिलेली आहेत.[२१]

तक्ता क्र. १.३.१७
औरंगाबाद जिल्ह्यातील तांत्रिक व व्यवसायशिक्षण (प्रमाण अंकात)

अ.क्र	घटक	विभाग	औरंगाबाद जिल्हा	महाराष्ट्र	औरंगाबाद जिल्हा	महाराष्ट्र
		वर्ष	२०१९-२०	२०२०-२१	२०२१-२२	२०२०-२१
१	व्यवसाय पदवी शिक्षण संस्था	संख्या	४४	१,१७७	४१	१,१७७
२	प्रवेश क्षमता	संख्या	७,०९९	२,०३,०७६	५,९५६	२,०३,०७६
३	व्यवसाय पदविका	संख्या	१२	१,०१७	१३	१,०१७

	शिक्षण संस्था					
४	प्रवेश क्षमता	संख्या	४,१४५	१,४३,९८०	३,९१५	१,४३,९८०
५	घटक	वर्ष	२०१९-२०	२०२०-२१	२०२१-२२	२०२१-२२
६	शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था	संख्या	९	४१७	११	४१७
७	प्रवेश क्षमता	संख्या	२२०४	९२,८५०	२३८४	९३,७४८
८	अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था विनाअनुदान	संख्या	५	५४१	५	५५७
९	प्रवेश क्षमता	संख्या	३३२	५४,९५६	३६०	५६,४५६

स्त्रोतः-जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद-२०२१-२२

विश्लेषणः-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद जिल्ह्यात २०१९-२० यावर्षी ४४ व २०२१-२२ यावर्षी ४१ व्यवसाय शिक्षण संस्था होत्या, तर महाराष्ट्रात २०२०-२१ यावर्षी ११७७ व्यवसाय शिक्षण संस्था होत्या. २०१९ च्या तुलनेत एकूण ३ संस्था बंद पडल्या. या संस्थेमध्ये २०१९-२० यावर्षी विद्यार्थी प्रवेश क्षमता औरंगाबाद जिल्ह्यात ७,०९९ इतकी होती, तर २०२१-२२ यावर्षी ५,९५६ इतकी झाली. व्यवसाय पदविका शिक्षण संस्थेमध्ये २०१९-२० च्या तुलनेत २०२१-२२ यावर्षी १ संस्था बंद पडली तसेच विद्यार्थी संख्या ४,१४५ ने घटवून ३,९१५ इतकी झाली. त्याचप्रमाणे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था २०१९-२० यावर्षी ९ होत्या त्या २०२१-२२ यावर्षी १९ झाल्या म्हणजे एकूण ३ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था वाढल्या. ज्याची प्रवेश क्षमता २०१९-२० यावर्षी

२,२०४ इतकी होती ती २०२१-२२ यावर्षी २,३८४ इतकी झाली. एकूण १८० विद्यार्थी संख्या वाढली; परंतु शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये कोणत्याही प्रकारची वाढ झाली नाही; मात्र विद्यार्थी संख्या ३३२ वरून ३६० झाली. व्यवसाय शिक्षणाच्या बाबतीत शिक्षण संस्था वाढल्या नाही; परंतु विद्यार्थी संख्या वाढली. याचा अर्थ विद्यार्थ्यांचा व्यवसाय शिक्षण संस्थेकडे अधिक कल असल्याचे दिसते, म्हणून औरंगाबाद जिल्ह्यात व्यवसाय शिक्षण संस्थांची संख्या वाढणे गरजेचे आहेत.

१.३.१८ औरंगाबाद जिल्ह्यातील नोंदणीकृत कारखाने व रोजगार:-

कारखाना ही एक औद्योगिक वास्तू आह. जेथे वस्तूंचे उत्पादन होते. कारखाना एका किंवा एकाहून अधिक इमारतींचा असू शकतो व त्यामध्ये विविध प्रकारची यंत्रे असतात. कारखान्यांमध्ये केवळ वस्तूंचे उत्पादनच नाही तर कच्च्या मालाचे एका स्वरूपामधून दुस-यामध्ये रूपांतर देखील होऊ शकते. खालील तक्त्यामध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील कारखाने व रोजगार विषयी माहिती दिली आहे.[२२]

तक्ता क्र. १.३.१८
औरंगाबाद जिल्ह्यातील नोंदणीकृत कारखाने व रोजगार (प्रमाण अंकात)

अ.क्र.	घटक	विभाग	औरंगाबाद जिल्हा	महाराष्ट्र	औरंगाबाद जिल्हा	महाराष्ट्र
		वर्ष	२०१५	२०२०	२०२०	२०२२
१	नोंदणीकृत कारखाने	संख्या	१,२००	३८,१७५	१,१२७	३८,०२०
२	नोंदणीकृत चालू कारखाने	संख्या	७५१	३५,६७६	१,१२७	३६,४८५
३	नोंदणीकृत कारखान्यातील कामगार संख्या	-	७९,६११	२७,९७,८६६	१,३६,५४७	२,९३८,३९४

स्त्रोत:- जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद-२०२१-२२

विश्लेषण:-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद जिल्ह्यामध्ये २०१५ यावर्षी नोंदणीकृत कारखान्यांची संख्या १२०० होती ती २०२० यावर्षी ११२७ इतकी झाली, तर

महाराष्ट्रात २०२० यावर्षी नोंदणीकृत कारखान्यांची संख्या ३८,९७५ व २०२२ यावर्षी ३८,०२० इतकी झाली. महाराष्ट्र आणि औरंगाबाद जिल्ह्यात कारखान्यांची संख्या वाढण्याऐवजी कमी झाली. औरंगाबाद जिल्ह्यात एकूण ७३ तर महाराष्ट्रात १५५ इतके उद्योग कमी झाले. नोंदणीकृत चालू कारखान्यांची संख्या औरंगाबाद जिल्ह्यात ३७६ ने कमी झाली, तर महाराष्ट्रात ८०९ ने कमी झाली. नोंदणीकृत कारखान्यातील कामगार संख्या औरंगाबाद जिल्ह्यात २०१५ यावर्षी ७९६११ इतकी होती, ती २०२० यावर्षी १,३६,५४७ इतकी झाली, तर महाराष्ट्रात २०२० यावर्षी कामगारांची संख्या २७,९७,८६६ इतकी होती ती २०२२ आली २,९३८,३९४ इतकी झाली. औरंगाबाद जिल्ह्यात २०१५ ते २०२० या काळात ५६,९३६ इतक्या कामगारांची संख्या वाढली, तर महाराष्ट्र राज्यात २०२० ते २०२२ या कालावधीत कामगारांची संख्या १,४०,५२८ इतकी वाढली. कामगारांच्या संख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसते; परंतु कारखान्यांच्या संख्येत झालेली वाढ ही कमी आहे.

१.३.१९ स्वयंरोजगाराच्या योजनेअंतर्गत लाभधारकांची संख्याः-

सरकारी अथवा खाजगी नोकरी न करता अर्थार्जनासाठी स्वतःने स्वतःचा व्यवसाय सुरू करणे म्हणजे स्वयंरोजगार होय. जगातील अनेक व्यक्ती स्वतःच्या कार्यात, व्यवसायात गुंतून स्वतःच्या व्यवसायाचे व्यवस्थापन करतात. स्वतःचा रोजगार स्वतःच्या व्यवसायातून निर्माण करणा-या व्यक्ती आपल्या व्यवसायाच्या भरभराटीसाठी सर्वोत्तम प्रयत्न करतात, जोखीम स्वीकारतात, स्वतः उत्पन्न घेतात व त्याचे मालकी हक्क स्वतःचे असतात. औरंगाबाद जिल्ह्यातील तरुणांना सरकारने स्वयंरोजगारासाठी कर्ज दिले आहेत त्याची माहिती खालील प्रमाणे आहे.[२३]

तक्ता क्र. १.३.१९

स्वयंरोजगाराच्या योजनेअंतर्गत लाभधारकांची संख्या (२०२१-२२)

(प्रमाण अंकात)

अ. क्र.	तालुका	जिल्हा उपकेंद्र	अग्रणी बँक मुद्रा योजने अंतर्गत प्राप्त झालेल्या लाभधारकांची संख्या	स्थानिक महामंडळे जिल्हा खादी ग्रामोद्योग मंडळ	विविध महामंडळे
१	औरंगाबाद	१९६	१,१५,४१५	१६	६२
२	सिल्लोड	२	९,९०५	२	३
३	पैठण	४	७,७०९	९	११
४	गंगापूर	१५	६,६६६	२१	९
५	कन्नड	७	६,३५८	१५	१३
६	वैजापूर	२	४,१६७	१०	६
७	फुलंब्री	०	९७८	५	३
८	खुलताबाद	०	८४८	४	१
९	सोयगाव	०	२९६	०	०

स्त्रोतः- जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद-२०२१-२२,

विश्लेषण:-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, २०२१-२२ नुसार अग्रणी बँक मुद्रा योजने अंतर्गत औरंगाबाद तालुक्यात जिल्हा उपकेंद्रांची संख्या १९६ आहे. व लाभधारकांची संख्या १,१५,४१५ इतकी आहे. स्थानिक महामंडळे जिल्हा खादी ग्रामोद्योग मंडळाची संख्या १६ असून विविध महामंडळांची संख्या ६२ इतकी आहे. औरंगाबाद नंतर जिल्हा उपकेंद्रांची संख्या सर्वात जास्त गंगापूर तालुक्यात असून ती संख्या १५ इतकी आहे. या तालुक्यात अग्रणी बँक मुद्रा योजने अंतर्गत लाभधारकांची संख्या ६,६६६ इतकी आहे. एकूण लाभधारकात गंगापूर या तालुक्याचा क्रमांक चौथा आहे, तर सिल्लोड या तालुक्यातील लाभधारकांची संख्या ९,९०५ इतकी आहे. या तालुक्यांमध्ये जिल्हा उपकेंद्राची संख्या फक्त २ आहे. स्थानिक महामंडळे जिल्हा खादी ग्रामोद्योग मंडळाची संख्या गंगापूर तालुक्यात सर्वात जास्त २१ आहे. व विविध महामंडळांची संख्या औरंगाबाद तालुक्यात सर्वात जास्त

६२ आहे. अग्रणी बँक मुद्रा योजनेतील भागधारकांच्या संख्येत सर्वात कमी संख्या सोयगाव या तालुक्यातील आहे. या तालुक्यांमध्ये जिल्हा उपकेंद्र, स्थानिक महामंडळ जिल्हा खादी ग्रामउद्योग व विविध महामंडळे यांची संख्या शून्य आहे. ज्या तालुक्यांमध्ये उपकेंद्रांची संख्या जास्त आहे. त्या ठिकाणी लाभधारकांची संख्यासुद्धा जास्त आहे असे दिसते.

१.३.२० औरंगाबाद जिल्ह्यातील चित्रपट गृहे, संस्था व त्यातील कामगारांची माहिती:-

मनोरंजन करण्यासाठी लोक चित्रपट पाहतात. त्यामुळे काही लोकांना रोजगार प्राप्त होते. औरंगाबाद जिल्ह्यातील चित्रपटगृहे व संस्था यामध्ये कार्य करणा-या कामगारांची माहिती खालील तक्त्यामध्ये दिलेली आहेत.[२४]

तक्ता क्र. १.३.२०
औरंगाबाद जिल्ह्यातील चित्रपट गृहे, संस्था व त्यातील कामगारांची माहिती
(२०२१-२२) (प्रमाण अंकात)

अ.क्र.	तालुका	कामगार नसलेल्या संस्था	एकूण कामगार	कामगारांची %
१	औरंगाबाद	४७,७७५	२,६५,०१०	८६.५
२	गंगापूर	८६३	१२,८६६	४.२
३	पैठण	३,२३०	९,७०६	३.१७
४	सिल्लोड	३,९३७	७,७८७	२.५४
५	वैजापूर	७४५	४,७२८	१.५४
६	कन्नड	९७८	३,१५०	१.०३
७	खुलताबाद	९०५	१,४५७	०.४८
८	फुलंब्री	१,१२९	१,३५१	०.४४
९	सोयगाव	३३८	३३१	०.११
-	एकूण	५९,९००	३,०६,३८६	१००

स्त्रोतः- जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद-२०२१-२२

विश्लेषणः-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद तालुक्यामध्ये २६५०१० कामगार काम करतात. एकूण कामगारांपैकी ८६.५% कामगार फक्त औरंगाबाद तालुक्यामध्ये काम करतात, तर दुस-या क्रमांकावरील गंगापूर तालुक्यात १२८६६ इतके

कामगार काम करतात. त्याचे प्रमाण ४.२% आहे. औरंगाबाद तालुक्याच्या प्रमाणात गंगापूर तालुक्यातील कामगारांची संख्या कमी आहे. एकूण कामगार संख्येच्या उतरत्या मांडणीनूसार पैठण, सिल्लोड, वैजापूर, कन्नड, खुलताबाद फुलंब्री या तालुक्यांचा क्रमांक लागतो. त्यांची संख्या अनुक्रमे ७७८७, ४७२८, ३१५०, १४५७, १३५१, ३३१, अशी आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील एकूण कामगार लोकसंख्येची संख्या ३०६३८६ इतकी आहे. त्याचप्रमाणे ५९९०० इतक्या संस्थेमध्ये कामगार काम करत नाही.

१.३.२१ औरंगाबाद जिल्ह्यातील कृषी व भौगोलिक क्षेत्रः-

कृषी हा शब्द कृष् म्हणजे 'नांगरणे' या धातूपासून झाला आहे, परंतु कृषी या संज्ञेचा अर्थ केवळ जमीन नांगरून तिथं पीक काढणे एवढ्यापुरताच मर्यादित नाही. कृषिव्यवसायाचा व्याप बराच विस्तृत आहे. माणसाच्या अन्न, वस्त्रादी गरजा भागविणारे पदार्थ आपणास वनस्पती व प्राणी यांच्यापासून मिळतात. त्याचप्रमाणे शेतीची उत्पादकता ही भौगोलिक प्रदेश यावर अवलंबून असते. खालील तक्त्यामध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील कृषी व भौगोलिक क्षेत्राविषयी माहिती दिलेली आहे.[२५]

तक्ता क्र. १.३.२१

औरंगाबाद जिल्ह्यातील कृषी व भौगोलिक क्षेत्र (प्रमाण हेक्टर)

अ.क्र.	घटक	विभाग	जिल्हा	महाराष्ट्र
		वर्ष	२०२०-२१	२०१९-२०
१	भौगोलिक क्षेत्र	हजार हेक्टर	१,००८	३०,७५८
२	वनक्षेत्रे	हजार हेक्टर	८१	५,२२२
३	वनक्षेत्राचे भौगोलिक	टक्के	८.०८	१६.९८
४	क्षेत्राशी प्रमाण			

स्त्रोतः- जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद-२०२१-२२

विश्लेषणः-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, वर्ष २०२०-२१ मध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील भौगोलिक क्षेत्र १००८ हजार हेक्टर, तर महाराष्ट्राचे २०१९-२० यावर्षी ३०,७५८ हजार हेक्टर इतके भौगोलिक क्षेत्र आहे. महाराष्ट्राचे क्षेत्रफळ औरंगाबादच्या

तुलनेत २९,७५०.०० हेक्टर जास्त आहे. २०२०-२१ यावर्षी औरंगाबाद जिल्ह्यातील वनक्षेत्र ८१ हेक्टर, तर महाराष्ट्रातील वनक्षेत्र २०१९-२० यावर्षी ५,२२२ हजार हेक्टर इतके आहे. औरंगाबाद जिल्ह्याच्या तुलनेत महाराष्ट्राचे वनक्षेत्र ५,१४१.०० हेक्टर जास्त आहे. औरंगाबाद जिल्हा वनक्षेत्राचे भौगोलिक क्षेत्राशी प्रमाण ८.०८% असून महाराष्ट्र राज्याचे प्रमाण १६.९८% इतके आहे. महाराष्ट्र राज्याच्या तुलनेत औरंगाबाद जिल्ह्यातील वनक्षेत्राचे प्रमाण ८.९% कमी आहे. भौगोलिक दृष्ट्या कोणत्याही क्षेत्रामध्ये एकूण क्षेत्रफळाच्या ३३ भूभाग जंगलाने व्यापलेला असणे आवश्यक आहे. त्याशिवाय संतुलन होत नाही, म्हणून औरंगाबाद क्षेत्राची अधिक जास्त झाडे लावण्याची आवश्यकता आहे.

१.३.२२ औरंगाबाद जिल्ह्यातील पिकाखालील क्षेत्र:-

धान्य, फळभाजी-पालेभाजी, मिरच्या-कोथिंबीर, मोहरी, तेलबिया, डाळी, ऊस, किंवा तत्सम वार्षिक उत्पन्न असलेल्या व रोजच्या स्वयंपाकासाठी लागणा-या आणि शेतात लहान उंचीच्या झुडूपावर उगवून कापणीयोग्य झालेल्या खाद्यपदार्थाला पीक म्हणतात. प्रत्येक पिकाचा एक हंगाम असतो. खालील तक्त्यामध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील पिकाखालील क्षेत्र ची माहिती दिलेली आहे.[२६]

तक्ता क्र. १.३.२२
औरंगाबाद जिल्ह्यातील पिकाखालील क्षेत्र(प्रमाण हेक्टर)

अ.क्र	घटक	विभाग	जिल्हा	महाराष्ट्र	जिल्हा
		वर्ष	२०२०-२१	२०१९-२०	२०२१-२२
१	एकूण पिकाखालील क्षेत्र	हजार हेक्टर	१,००६	२३,५७१	१,०३०
२	ओलिताखालील क्षेत्र				
३	निव्वळ ओलिताचे क्षेत्रफळ	हजार हेक्टर	१५४	-	१५४
४	एकूण ओलीतक्षेत्र	हजार हेक्टर	३१४	-	३२०

५	महत्त्वाच्या पिकाखालील क्षेत्र		२०२०-२१	२०१९-२०	२०२१-२२
६	तृणधान्य	हजार हेक्टर	३८९	६,९७६	३९१
७	कडधान्य	हजार हेक्टर	११९	४,३१६	१३४
८	तेलबिया	हजार हेक्टर	२२	४,५२६	४७
९	ऊस	हजार हेक्टर	१९	८२२	२२
१०	कापूस	हजार हेक्टर	३९९	४,४९१	३६२

स्त्रोतः- जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद-२०२१-२२

विश्लेषणः-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद जिल्ह्यात २०२०-२१ यावर्षी एकूण पिकाखालील क्षेत्र १,००६ हेक्टर, तर २०२१-२२ यावर्षी १,०३० हजार हेक्टर होते. २०२०-२१ च्या तुलनेत पिकाखालील क्षेत्राची संख्या २४ हजार हेक्टरने वाढली हे प्रमाण महाराष्ट्र राज्यात २०१९-२० यावर्षी २३,५७१ हेक्टर, तर २०२०-२१ यावर्षी २३,८९९ इतके होते. २०२०-२१ च्या तुलनेत महाराष्ट्र राज्यात ३२८ हजार हेक्टरने वाढ झाली. औरंगाबाद जिल्ह्यात विविध पिकांची लागवड केली जाते. त्यामध्ये तृणधान्य, कडधान्य, तेलबिया, ऊस, कापूस ही महत्त्वाची पिके आहेत. २०२०-२१ यावर्षी औरंगाबाद जिल्ह्यात तृणधान्यांचे उत्पादन ३८९ हजार हेक्टर इतके झाले, तर २०२१-२२ व्या यावर्षी त्यात २००० हेक्टरने वाढ झाली; परंतु महाराष्ट्रात १०३ हजार हेक्टरने वाढ झाली. इतर पिकांमध्ये तुलनात्मक वाढ झाली असली तरी कापूस या उत्पादनात मात्र ३७ हजार हेक्टर इतकी घसरण झाल्याचे दिसते; परंतु महाराष्ट्रात कापूस उत्पादनामध्ये २,५८८ हेक्टरने वाढ झाली.

१.३.२३ औरंगाबाद जिल्ह्यातील पशूसंवर्धनः-

उत्पादनशील पाळीव प्राण्यांची उत्पादनक्षमता किंवा उपयुक्तता वाढविण्याच्या दृष्टिकोनातून त्यांचे प्रजनन व पालनपोषण करणे पशूसंवर्धनाचा खरा अर्थ आहे. नुसती त्यांची संख्या वाढवीत राहणे, हे पशूसंवर्धन नव्हे. खालील तक्त्यामध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील पशूसंवर्धनाविषयी माहिती दिलेली आहे.[२७]

तक्ता क्र. १.३.२३
औरंगाबाद जिल्ह्यातील पशूसंवर्धन (प्रमाण हजार)

अ.क्र.	घटक	विभाग	जिल्हा	महाराष्ट्र	जिल्हा
		वर्ष	२०१२	२०१९	२०२१-२२
१	एकूण पशूधन	हजार	१,०८६	३३,०८०	१,१६४
२	गो जातीय	हजार	३१९	१३,९९३	५३९
३	म्हशी वर्गीय	हजार	९१	५,६०४	९४५
४	मेंढ्या व शेळ्या	हजार	३९१	१३,२८५	५१९
५	कुक्कुटादी पक्षी	हजार	८२८	७४,२९८	५८४
६	एकूण दुग्ध उत्पादन	हजार लिटर	३६,९९२	११,६५४	२५,११०

कुक्कुटादी पक्षी यामध्ये टर्किक्वेल व इतर कुक्कुटादी पक्षी यांचाही समावेश करण्यात आला आहे.
इतर पशूधनास सह इतर पशूधन या बाबींमध्ये घोडे, शिंगरे,खेचरे उंट व गाढवे यांचा समावेश करण्यात आलेला आहे..

स्त्रोतः- जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद-२०२१-२२

विश्लेषणः-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, सन २०१२ यावर्षी औरंगाबाद जिल्ह्यात एकूण पशूधन १०८६ इतके होते, तर २०२१-२२ व्या यावर्षी त्यात ७८ हजार पशुधनाची वाढ झाली. २०१९ यावर्षी महाराष्ट्रात एकूण पशूधनाची संख्या ३३,०८० हजार इतकी होती. २०१२ यावर्षी गो जातीय पशूधनाची संख्या औरंगाबाद जिल्ह्यात ३१९ हजार, तर २०२१-२२ वर्षे त्यात २२० हजाराने वाढ झाली. महाराष्ट्रात दुग्धोत्पादनासाठी म्हशी व मेंढ्यांचे पालन

केले जाते. २०१२ यावर्षी मेंढ्या व शेळ्यांची संख्या ३९१ हजार, तर २०२१-२२ व्या यावर्षी त्यात वाढ होऊन ५१९ झाली. महाराष्ट्रात म्हैस दूध उत्पादनासाठी विशेष करून पाळली जाते. औरंगाबाद जिल्ह्यात २०१२ यावर्षी म्हशींची संख्या ९१ हजार होती, त्यात वाढ होऊन ती २०२१-२२ यावर्षी ९४५ हजार इतकी झाली. तब्बल ८५४ हजार म्हशींची संख्या औरंगाबाद जिल्ह्यात वाढली. दुग्ध व्यवसाय औरंगाबाद जिल्ह्यात खूप मोठ्या प्रमाणात केला जातो. २०१२ यावर्षी औरंगाबाद जिल्ह्यात एकूण दूध उत्पादन ३६,९९२ हजार लिटर होते, तर २०२१-२२ यावर्षी ते २५,११० हजार लिटर झाले. म्हणजे एकूण ११,८८२ हजार लिटरची घट झाली.

१.३.२४ औरंगाबाद जिल्ह्यातील सहकार क्षेत्र:-

मानव जातीतील समूहजीवन जगण्याची उपजत असणारी सहजप्रवृत्ती तसेच पारस्परिक सहकार्य करण्याची पद्धत. तांत्रिकदृष्टया सहकार म्हणजे विशेष पद्धतीने व्यवसाय करण्याचा प्रकार. सहकार हा को-ऑपरेशन या इंग्रजी शब्दाचा मराठी पारिभाषिक शब्द असून तो को-ऑपरेरी या लॅटिन शब्दापासून बनलेला आहे. औरंगाबाद जिल्ह्यामध्ये सहकारी तत्त्वावर अनेक कारखाने चालतात त्याची माहिती खालील तक्त्यात दिलेली आहे.[२८]

तक्ता क्र. १.३.२४

औरंगाबाद जिल्ह्यातील सहकार क्षेत्र (प्रमाण अंकात)

अ.क्र.	घटक	विभाग	जिल्हा	महाराष्ट्र	जिल्हा	महाराष्ट्र
१		वर्ष	२०११-१२	२०१८ -१९	२०२१-२२	२०२१
२	सहकारी संस्था प्राथमिक	संख्या	४,८८५	२१२,९५१	४,८८५	२,१७,३५५
३	कृषी सहकारी पतसंस्था	संख्या	६९२	२०,७४४	६९२	२०,८९७
४	सभासद संख्या	हजार	४०४	१४,६८३	३९७	१५,०६३
५	दिलेले कर्ज	रुपये लाख	५१,८७५	१४,४९,५००	५२,६७९	१,४१८,९०

६	येणारे कर्ज	रुपये लाख	६४,११७	१३,३७,६००	६४,८६०	१३,८९,०००
७	सहकारी दुग्ध संस्था	संख्या	३९५	१२,७८१*	४००	१३,२३५*
८	सहकारी दुग्ध संस्था ३१ मार्च २०२० अखेर				सहकारी दुग्ध संस्था ३१ मार्च २०२१ अखेर	

स्त्रोतः- जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद-२०२१-२२

विश्लेषणः-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद जिल्ह्यात २०११-१२ यावर्षी सहकारी संस्थांची संख्या ४८८५ होती. २०२१-२२ यावर्षी त्यामध्ये काहीच वाढ झाली नाही; परंतु महाराष्ट्रात २०१८-१९ यावर्षी सहकारी संस्थांची संख्या २,१२,९५१ इतकी होती, ती २०२१ पर्यंत २,१७,३५५ इतकी झाली. प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांची संख्या २०११-१२ च्या तुलनेत वाढली नाही; परंतु महाराष्ट्र राज्यात प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांची संख्या २०,७४४ वरून २०२१ पर्यंत २०,८९७ इतकी झाली. सभासद संख्यामध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील सभासद संख्या २०११-१२ झाली ४०४ वरून २०२१-२२ पर्यंत ३९७ झाली एकूण ७ सभासद संख्या कमी झाली. त्या तुलनेत महाराष्ट्रात २०१८-१९ आली एकूण सभासद संख्या १४,६८३ इतकी होती २०२१ यावर्षी १५,०६३ इतकी झाली. या संस्थेमधून सभासदांना कर्ज दिले गेले, त्यात २०११-१२ यावर्षी औरंगाबाद जिल्ह्यात ५१८७५ लाख रुपये इतक्या सभासदांना कर्ज देण्यात आले; परंतु २०२१-२२ यावर्षी त्यात घट होऊन ५२६७९ लाख रुपये इतकी झाली. महाराष्ट्रात २०१८-१९ यावर्षी १४,४९,५०० लाख रुपये कर्ज देण्यात आले होते; परंतु २०२१ मध्ये त्यात घट होऊन १४,१८,९० लाख रुपये कर्ज देण्यात आले. सहकारी तत्त्वावर सहकारी दुग्ध संस्था कार्य करतात त्यांची संख्या औरंगाबाद जिल्ह्यात २०११-१२ यावर्षी ३९५ इतकी होती ती २०२१-२२ यावर्षी ५ ने वाढली.

१.३.२५ औरंगाबाद जिल्ह्यातील कृषी पंप संचः-

भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे कृषी क्षेत्रावर अवलंबून असणा-या लोकांची संख्या जास्त आहे. शेती ही पाण्यावर अवलंबून असल्यामुळे ज्या ठिकाणी कृत्रिम

पाणीपुरवठ्याची सोय जास्त असते; त्या भागात जास्त शेती केली जाते कारण शेतीसाठी विजेची आवश्यकता सर्वात जास्त असते. खालील तक्त्यामध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील कृषी पंपाची माहिती दिलेली आहे.[२९]

तक्ता क्र. १.३.२५
औरंगाबाद जिल्ह्यातील कृषी पंप संच (प्रमाण अंकात)

अ.क्र.	घटक	विभाग	जिल्हा	महाराष्ट्र	जिल्हा	महाराष्ट्र
		वर्ष	२०२१	२०२१	२०२१-२२	२०२२
१	विद्युतीकरण झालेले गाव	संख्या	१,३१४	४१,९२३	१,३१४	४१,९२३
२	वीज पुरवठा केलेले कृषी पंप संच	हजार	२२६	४,४४०	२२९	४,५८६

स्त्रोतः- जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद-२०२१-२२

विश्लेषणः-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, विद्युतीकरण झालेल्या गावांची संख्या औरंगाबाद जिल्ह्यात २०२१ या दिवसापर्यंत १,३१४ इतकी होती. २०२१-२२ मध्ये त्यात कोणत्याही प्रकारची वाढ झाली नाही. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्यात २०२१ या दिवसापर्यंत विद्युतीकरण झालेल्या गावांची संख्या ४१,९२३ इतकी होती, त्यातदेखील २०२२ पर्यंत कोणतीही वाढ झाली नाही; परंतु २०२१ या दिवसापर्यंत वीजपुरवठा केलेली कृषी पंप संच संख्या २२६ हजार इतकी होती ती २०२१-२२ वर्षापर्यंत २२९ इतकी झाली, त्यात एकूण ३ पंपांची भर पाडली. महाराष्ट्र राज्यात मात्र पंपांच्या संख्येमध्ये समाधानकारक वाढ झाल्याचे दिसून येत नाही; कारण महाराष्ट्रात २०२१ या तारखेपर्यंत वीज पुरवठा केलेली कृषी पंप संच संख्या ४,४४० हजार होती. २०२२ या दिवसापर्यंत एकूण संख्या ४,५८६ हजार झाली म्हणजे एकूण संख्या मध्ये फक्त ४६ हजार पंप संचाची वाढ झाली. भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे शेतीवर उपजीविका करणा-या लोकांची संख्या खूप जास्त

आहे, म्हणून सरकारने शेतीमध्ये बारमाही पाणीपुरवठ्याची सुविधा करावी त्यामुळे शेतक-यांचे उत्पन्न वाढेल.

१.३.२६ औरंगाबाद जिल्ह्यातील विजेचा वापर:-

आधुनिक युग हे तंत्रज्ञानाचे युग असल्यामुळे सर्व यंत्रे विजेवर चालतात. विजेचा पुरवठा जितका जास्त असेल; तितकी विकासाची गती ही जास्त असते. खालील तक्त्यामध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील विजेच्या वापराविषयी माहिती दिलेली आहे.[३०]

तक्ता क्र. १.३.२६

औरंगाबाद जिल्ह्यातील विजेचा वापर (प्रमाण-द.कि.ता)

अ.क्र.	घटक	विभाग	२०२१	२०२१	२०२१-२२	२०१९-२२
		वर्ष	जिल्हा	महाराष्ट्र	जिल्हा	महाराष्ट्र
१	घरगुती	द.कि.ता.	१४.७१	२९,३०१	१६	३०,२२९
२	वाणिज्य	द.कि.ता.	३.६१	१३,१२३	३	९,४१५
३	औद्योगिक	द.कि.ता.	८१.९८	४६,५०७	११	४४,१०९
४	कृषी	द.कि.ता.	३५४.५२	२९,११८	३४८	३३,९२४
५	इतर	द.कि.ता.	१२.१४	७,४१५	५	७,०१४
६	एकूण	द.कि.ता.	४६६.९६	१,२५,४६४	३८३	१,२४,६९१
द.कि.ता.= दशलक्ष किलोवॅट तास						

स्त्रोत:- जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद-२०२१-२२

विश्लेषण:-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद जिल्ह्यात २०२१ या दिवसापर्यंत घरगुती विजेचे वापर १४.७१ दशलक्ष किलोवॅट तास इतके होते, त्यात २०२१-२२ यावर्षी वाढ होऊन १६ इतके झाले, तर महाराष्ट्रामध्ये २०२१ या दिवसापर्यंत घरगुती विजेचे वापर २९,३०१ दशलक्ष किलोवॅट तास इतके होते, त्यात २०१९-२० मध्ये वाढ होऊन. ३०,२२९ दशलक्ष किलोवॅट तास इतकी झाली.१८ विजेचा वापर घरगुती क्षेत्राबरोबर वाणिज्य औद्योगिक आणि कृषी क्षेत्रामध्ये देखील केला जातो. २०२१ या दिवसापर्यंत वाणिज्य क्षेत्रात

विजेचे वापर ३.६१, उद्योग क्षेत्रामध्ये ८१.९८, कृषी क्षेत्रात ३५४.५२ व इतर क्षेत्रात १२.१४ दशलक्ष किलोवॅट तास इतके वापर होते. २०२१-२२ यावर्षी केवळ घरगुती क्षेत्र वगळले असता इतर क्षेत्रांमध्ये वाढ होण्याऐवजी घट झालेली दिसते; परंतु महाराष्ट्राच्या बाबतीत घरगुती क्षेत्रांमध्ये विजेचा वापर २०२१ यावर्षी २९,३०१ दशलक्ष किलोवॅट तास वरून २०१९-२२ यावर्षी ३०,२२९ दशलक्ष किलोवॅट तास इतके झाले. कृषी क्षेत्र वगळले असता इतर क्षेत्रांमध्ये विजेच्या वापरात वाढ होण्याऐवजी घट झाल्याचे दिसत आहे.

१.३.२७ औरंगाबाद जिल्ह्यातील शिधापत्रिका धारकांची संख्या:-

राष्ट्रीय अन्न सुरक्षा गरीब व गरजू लोकांना त्यांची भूक भागविता यावी त्यांना प्रतिष्ठेचे जीवन जगण्यासाठी सवलतीच्या दराने हक्काचे धान्य मिळावे यासाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा केंद्र शासनाने संमत केला आहे. या नुसार गरजू लोकांना त्यांच्या उत्पन्न गटा नुसार शिधापत्रिका/ रेशनकार्ड चे प्रकार पिवळे, केशरी आणि पांढरे देण्यात येत असतात. खालील तक्त्यामध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील शिधापत्रिकाधारकांची संख्या दिलेली आहे.[३१]

तक्ता क्र. १.३.२७

औरंगाबाद जिल्ह्यातील शिधापत्रिका धारकांची संख्या (प्रमाण-अंकात)

अ. क्र.	विभाग	रास्त भाव धान्य दुकानांची संख्या	दारिद्र्य रेषेखालील शिधापत्रिकाधारकांची संख्या %	एकूण शिधापत्रिकाधारकांची संख्या %
१	औरंगाबाद	४१५	३८.९०	४२.२३
२	गंगापूर	२५१	११.३८	११.७२
३	कन्नड	२३९	१२.४६	१०.१०
४	सिल्लोड	२०५	७.७१	८.६५
५	वैजापूर	२१७	७.०४	८.३५
६	पैठण	२१७	९.४७	८.११
७	फुलंब्री	१११	५.३१	४.२९
८	खुलताबाद	८९	४.०४	३.४४
९	सोयगाव	५८	३.६९	३.११
	एवूण	१,८०२	५,९९,९८१	८,०१,२६३

संदर्भ वर्ष -२०२१-२२

स्त्रोतः- जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद-२०२१-२२

विश्लेषणः-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद जिल्ह्यामध्ये २०२१-२२ नुसार ८,०१,२६३ शिधापत्रिकाधारकांची संख्या आहे, त्यात पिवळया दारिद्र्य रेषेखालील शिधापत्रिकाधारकांची संख्या १,१९,०७४ आहे, तर अंत्योदय अन्न योजनातील लाभार्थींची संख्या ६९,२११ इतकी आहे. केसरी दारिद्र्य रेषेखालील लाभधारकांची संख्या ५,९९,९८१ तर अन्नपूर्ण आणि शुभ्र शिधापत्रिका धारकांची संख्या अनुक्रमे ५७१ व १२,४२६ इतकी आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील एकूण ९ तालुक्यामध्ये औरंगाबाद तालुक्यात सर्वात जास्त ४१५ रास्त धान्य दुकानदारांची संख्या आहे, तर दारिद्र्य रेषेखालील शिधापत्रिकाधारकांच्या संख्येचे प्रमाण ३८.९०% आहे. इतर तालुक्याच्या तुलनेत हे प्रमाण सर्वात जास्त आहे. त्याचप्रमाणे एकूण शिधापत्रिकाधारकांच्या संख्येच्या प्रमाणात औरंगाबाद तालुका सर्वात पुढे आहे. त्याचे प्रमाण ४२.२३% इतकी आहे. गंगापूर तालुक्यात एकूण शिधापत्रिकाधारकांची संख्या कन्नड तालुक्यापेक्षा जास्त आहे; परंतु दारिद्र्य रेषेखालील शिधापत्रिकाधारकांची संख्या कन्नड तालुक्यात जास्त आहेत. कन्नड, तालुक्यातील, हे प्रमाण १२.४६% आहे. औरंगाबाद जिल्ह्यात सोयगाव तालुक्यामध्ये दारिद्र्यरेषेखाली शिधापत्रिकाधारकांची संख्या तसेच एकूण शिधापत्रिकाधारकांची संख्या सर्वात कमी असून ते प्रमाण ३.६९% व ३.११% इतके आहे. सोयगावच्या तुलनेत औरंगाबाद, फुलंब्री, पैठण,। वैजापूर व सिल्लोड या ठिकाणी शिधापत्रिका लोकसंख्या तुलनेने जास्त आहे. रास्त भाव धान्य दुकानदारांची संख्या औरंगाबाद तालुक्यात सर्वात जास्त असली तरी, इतर तालुक्यात गंगापूर तालुक्यातील रास्त भाव धान्य दुकानदारांची संख्या २५१ इतकी आहे, तर सोयगाव या तालुक्यात फक्त ५८ रास्त भाव धान्य दुकानदारांची संख्या आहे. एकूण दुकानांच्या २३.२% दुकाने केवळ औरंगाबाद तालुक्यात आहे. सोयगाव तालुक्यात हे प्रमाण ३.२ इतके आहेत.

१.३.२८ औरंगाबाद जिल्ह्यातील उद्योगाबाबतचा तपशिलः-

उद्योग म्हणजे ज्या उत्पादनसंस्थांत नैसर्गिक साधनसामग्रीवर प्रक्रिया करून उपभोग्य किंवा पुढील उत्पादन प्रक्रियेस उपयुक्त, असा एकच प्रकारचा माल निर्माण केला

जातो, अशा उत्पादनसंस्थांचा समूह. खालील तक्त्यामध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील उद्योगांचा तपशिल दिलेला आहे.[३२]

तक्ता क्र. १.३.२८

औरंगाबाद जिल्ह्यातील उद्योगाबाबतचा तपशिल

अ. क्र.	तालुका	महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ			
		प्रकल्पाची संख्या	क्षेत्र हेक्टर	रोजगार संख्या लाख	गुंतवणूक रुपये कोटी
१	कन्नड	०	०	०	०
२	सोयगाव	०	०	०	०
३	सिल्लोड	०	०	०	०
४	फुलंब्री	०	०	०	०
५	औरंगाबाद	२,२६७	१,१६०.९५	०.२२	३,४१८.३३
६	खुलताबाद	०	०	०	०
७	वैजापूर	०	०	०	०
८	गंगापूर	२,१६०	१,१६६.९७	०.५३	५,३५०.६८
९	पैठण	३४५	२२३.७	०.५	७९८.०९
	एकूण	४,७७२	२,५५१.६२	१.२६	९,५६७.१

स्त्रोतः- जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद-२०२१-२२

विश्लेषणः-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद जिल्ह्यात प्रकल्पांची संख्या ४७७२ असून त्याचे क्षेत्र ११६०.९५ आहे, त्यात एकूण रोजगाराची संख्या १.२६ लाख असून एकूण गुंतवणूक ९५६७.१ कोटी रुपये आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील नऊ तालुक्यांपैकी केवळ तीन तालुक्यांमध्ये औद्योगिक प्रकल्प उभारण्यात आलेले आहे. व इतर सहा तालुक्यांमध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अंतर्गत मोठे प्रकल्प नाही. औरंगाबाद जिल्ह्यातील एकूण प्रकल्पांपैकी ४८% प्रकल्प फक्त औरंगाबाद तालुक्यात आहे. व एकूण क्षेत्रापैकी ४५.४९% क्षेत्र प्रकल्पांनी व्यापले आहे. गुंतवणूकीच्या बाबतीत औरंगाबाद तालुक्यात ३५.७३ कोटी रुपयांची गुंतवणूक आहे. गंगापूर तालुक्यात ४५% प्रकल्प असून त्याची गुंतवणूक ५५.९३ कोटी रुपये आहे. एकूण क्षेत्राच्या ४५.७३% इतका

भाग गंगापूर तालुक्यातील प्रकल्पांनी व्यापलेला आहे. तिस-या क्रमांकावर पैठण तालुका आहे. या तालुक्यात ७% प्रकल्प असून एकूण क्षेत्र ८.७७% आहे, तर गुंतवणूक ८.३४ कोटी रुपये आहे. औरंगाबाद मुख्यालय असल्यामुळे त्या ठिकाणी उद्योगांची संख्या जास्त आहे, तर पैठण या ठिकाणी पाण्याची व्यवस्था असल्यामुळे त्या ठिकाणी उद्योग जास्त असल्याचे दिसते. गंगापूर हा औरंगाबादच्या शेजारी असल्यामुळे औरंगाबादच्या सीमावर्ती भागात उद्योगांची संख्या जास्त आहे.

१.३.२९ औरंगाबाद जिल्ह्यातील औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्राचा तपशिलः-

औद्योगिक विकासामुळे औरंगाबादचा विकास खूप वेगाने झाला आहे. खालील तक्त्यात औरंगाबाद जिल्ह्यातील औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्राचा तपशिल दिलेला आहे.[३३]

तक्ता क्र. १.३.२९
औरंगाबाद औद्योगिक विकास महामंडळा

अ. क्र.	तालुका	सहकारी औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्राची संख्या			
		प्रकल्पाची संख्या	क्षेत्र हेक्टर	रोजगार संख्या लाख	गुंतवणूक कोटी
१	कन्नड	१	१०.५	०.००१	१००
२	सोयगाव	०	०	०	०
३	सिल्लोड	१	४.९३	०.००४	१४०
४	फुलंब्री	०	०	०	०
५	औरंगाबाद	२	३.४४	०.००२	१२०
६	खुलताबाद	०	०	०.००३	०
७	वैजापूर	२	६६.१	०	१५०
८	गंगापूर	१	०	०	०
९	पैठण	१	५.२	०.००२	११०
	एकूण	८	९०.१७	०.०१२	६२०

स्त्रोतः- जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद-२०२१-२२

विश्लेषणः-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद जिल्ह्यामध्ये सहकारी तत्त्वावरील औद्योगिक प्रकल्पांची संख्या ८ असून त्यापैकी औरंगाबाद व वैजापूर या ठिकाणी प्रत्येकी दोन तर कन्नड, सिल्लोड, गंगापूर आणि पैठण या तालुक्यात प्रत्येकी एक-एक प्रकल्प आहे. या प्रकल्पात एकूण क्षेत्र ९०.१७ हेक्टर आहे. त्यांपैकी सर्वात जास्त क्षेत्र वैजापूर तालुक्यात असून ते ६६.१ हेक्टर इतके आहे. त्यापेक्षा कमी सिल्लोड तालुक्यात असून ते ४.९३ हेक्टर आहे. सहकार क्षेत्राच्या बाबतीत औरंगाबाद शहरातील क्षेत्रफळ सर्वात कमी असून ते केवळ ३.४४ हेक्टर आहे. सहकार क्षेत्रामध्ये रोजगाराची संख्या तुलनेने कमी आहे. एकूण सहकार क्षेत्रामध्ये केवळ ०.०१२ लाख रोजगारांची संख्या आहे, तर जिल्ह्यात एकूण गुंतवणूक ६२० कोटी रुपये असून सर्वात जास्त गुंतवणुक १५० कोटी रुपये वैजापूर तालुक्यात आहे. त्यानंतर सिल्लोड १४० कोटी, औरंगाबाद १२० कोटी, पैठण ११० कोटी आहे सर्वात कमी गुंतवणूक कन्नड तालुक्यात १०० कोटी आहे.

१.३.३० औरंगाबाद जिल्ह्यातील मोठ्या उद्योगाबाबतचा तपशिलः-

गुंतवणूकीनुसार उत्पादन व सेवा असे उद्योगाचे दोन प्रकार पडतात, तर उत्पादन क्षेत्रात सूक्ष्म उपक्रम या उद्योगात २५ लाखांपेक्षा जास्त गुंतवणूक असते, तर लघु उपक्रमात २५ लाखापासून तर पाच कोटी पर्यंत गुंतवणूक असते, तर मध्यम उद्योगात पाच कोटी पासून तर दहा कोटी पर्यंत गुंतवणूक असते, याचप्रमाणे सेवाक्षेत्रात सूक्ष्म उद्योगात दहा लाखापर्यंत गुंतवणूक असते, तर लघु उद्योगात दहा लाखांपासून तर दोन कोटी पर्यंत व मध्यम उद्योगात दोन कोटी पासून तर पाच कोटी पर्यंत गुंतवणूक असते. खालील तक्त्यामध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील उद्योगांची माहिती दिलेली आहे.[३४]

तक्ता क्र. १.३.३०

औरंगाबाद जिल्ह्यातील मोठ्या उद्योगाबाबतचा तपशिल

अ क्र	तालुका	जिल्ह्यातील औद्योगिक गुंतवणूक- मोठे उद्योग			
		प्रकल्पाची संख्या	क्षेत्र हेक्टर	रोजगार संख्या लाख	गुंतवणूक कोटी
१	कन्नड	३	२६.१	०.०१	१७५
२	सोयगाव	०	०	०	०
३	सिल्लोड	०	०	०	०
४	फुलंब्री	१	५.९	०.०१	७८
५	औरंगाबाद	८३	४९८	०.१३	४,८९३
६	खुलताबाद	०	०	०	०
७	वैजापूर	१	७.२	०.०२	२१
८	गंगापूर	५७	३४०	०.०९	४,३०५
९	पैठण	२८	१६६	०.१	१,७३२
	एकूण	१७३	१,०४३	०.३६	११,२०४

स्त्रोतः- जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद-२०२१-२२

विश्लेषणः-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद जिल्ह्यात एकूण मोठ्या प्रकल्पांची संख्या १७३ असून त्यापैकी ८३ औरंगाबाद, ५७ गंगापूर, २८ पैठण, ३ कन्नड १ फुलंब्री व एक प्रकल्प वैजापूर तालुक्यात आहे. या मोठ्या प्रकल्पात एकूण क्षेत्र १०४३ हेक्टर असून त्यापैकी सर्वात जास्त ४९८ हेक्टर क्षेत्र औरंगाबाद तालुक्यात आहे. व सर्वात कमी क्षेत्र फुलंब्री तालुक्यातील असून ते ५.९ हेक्टर इतके आहे. मोठ्या प्रकल्पातून मिळणा-या रोजगाराची संख्या ०.३६ लाख असून सर्वात जास्त रोजगार ०.१३ लाख औरंगाबाद तालुक्यात आहे. व मोठ्या उद्योगातून मिळणारा सर्वात कमी रोजगार कन्नड व फुलंब्री तालुक्यात प्रत्येकी ०.०१ लाख आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील एकूण गुंतवणूक ११२०४ कोटी असून त्यापैकी सर्वात जास्त गुंतवणूक ४८९३ कोटी रुपये औरंगाबाद तालुक्यात आहे. व सर्वात कमी गुंतवणूक २१ कोटी रुपये वैजापूर तालुक्यात आहे. गंगापूर

व पैठण या तालुक्यात पाण्याचे प्रमाण जास्त आहे, त्याचप्रमाणे हे दोन्ही तालुके औरंगाबादच्या सीमा लगत असल्यामुळे उद्योगांची संख्या या ठिकाणी जास्त आहेत.

१.३.३१ औरंगाबाद जिल्ह्यातील संवर्गनिहाय कारखान्यांचा तपशिलः-

उद्योगामुळे वातावरणात किती प्रदूषण होते, त्यानुसार तो उद्योग, लाल, नारंगी, हिरवा किंवा पांढरा या संवर्गात मोडतो. उद्योगांचा प्रदूषण निर्देशांक २० पांढरा, २१ ते ४० हिरवा ४१ ते ५९ नारंगी, ६० लाल या प्रकारे मोजला जातो. निर्देशांक जितका जास्त तितका तो उद्योग जास्त प्रदूषण पसरवतो. अशा उद्योगांच्या परवानगीसाठी नियम कठीण असतात. ज्या उद्योगांचा निर्देशांक २० पेक्षा कमी असतो अशा उद्योगांच्या मान्यतेसाठी नियम व अटी कमी असतात.[३५]

तक्ता क्र. १.३.३१
औरंगाबाद जिल्ह्यातील संवर्गनिहाय कारखान्यांचा तपशिल

अ.क्र.	तालुका	कारखान्यांचा संवर्ग संख्या				एकूण
		लाल	नारंगी	हिरवी	पांढरी	
२	कन्नड	९२	२६	२१९	०	३३७
३	सोयगाव	११	१५	९६	०	१२२
४	सिल्लोड	३४	१५	१५२	०	२०१
५	फुलंब्री	१०	१८	२१०	०	२३८
६	औरंगाबाद	३०५	२७८	१,१४५	४१	१,७६९
७	खुलताबाद	१०	२५	२८७	०	३२२
८	वैजापूर	३५	२७	२२४	०	२८६
९	गंगापूर	३५१	२२४	१,१३७	०	१,७१२
१०	पैठण	९७	१२६	२२१	०	४,४४
एकूण		९४५	७५४	३,६९१	४१	५,४३१

स्त्रोतः- जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद-२०२१-२२

विश्लेषणः-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद जिल्ह्यामध्ये एकूण ५४३१ इतके उद्योग आहे, त्यात लाल संवर्गातील उद्योगांची संख्या ९४५, नारंगी ७५४, हिरवी ३६९१ व पांढरी ४१ इतकी आहे. फक्त गंगापूर तालुक्यामध्ये लाल संवर्गातील उद्योगांची संख्या सर्वात जास्त ३५१ इतकी आहे व दुस-या क्रमांकावर औरंगाबाद तालुक्याचा क्रमांक

लागतो. त्याची संख्या ३०५ इतकी आहे, तर फुलंब्री व खुलताबाद तालुक्यामध्ये प्रत्येकी दहा-दहा उद्योग आहे. नारंगी संवर्गातील उद्योगात औरंगाबाद तालुका प्रथम क्रमांकावर आहेत. त्या ठिकाणी एकूण २७८ तर सर्वात कमी उद्योग सोयगाव आणि सिल्लोड तालुक्यात आहे. हिरव्या संवर्गातील उद्योगात औरंगाबाद हा प्रथम क्रमांकावर असून गंगापूर हा दुस-या क्रमांकावर आहे, तर पांढ-या संवर्गातील उद्योग एकूण ४१ असून सर्व औरंगाबाद तालुक्यात आहे. एकूण उद्योगांमध्ये औरंगाबाद तालुक्यात सर्वात जास्त १७६९ उद्योग असून दुस-या क्रमांकावर गंगापूर तालुका आहे. तेथील उद्योगांची संख्या १७१२ इतकी आहे; मात्र उद्योगांमध्ये सर्वात कमी संख्या असणारा तालुका सोयगाव आहे त्या ठिकाणी फक्त १२२ उद्योग आहे.

१.३.३२ औरंगाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगाबाबतचा तपशिलः-

उत्पादन क्षेत्रातील सूक्ष्म उद्योगात २५ कोटी पर्यंत गुंतवणूक असते तर मध्यम उपक्रमात ५ कोटी पासून तर १० कोटी पर्यंत गुंतवणूक असते. त्याचप्रमाणे सेवा क्षेत्रातील सूक्ष्म उपक्रमात १० लाखापर्यंत गुंतवणूक असते, तर मध्यम उपक्रमात २ कोटी पेक्षा जास्त व ५ कोटी पर्यंत गुंतवणूक असते.[३६]

तक्ता क्र. १.३.३२

औरंगाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगाबाबतचा तपशिल

अ. क्र.	तालुका	उद्योग संदर्भ असलेले सूक्ष्म लघु व मध्यम उपक्रम संख्या	रोजगार संख्या लाख	गुंतवणूक लाख रुपये
१	कन्नड	३१४	१.५	६,३२२
२	सोयगाव	४२	०.०३	१,२४८
३	सिल्लोड	४११	०.२५	७,७९८
४	फुलंब्री	२०९	०.१	५,३४५
५	औरंगाबाद	१५,४१८	७.२	१६,९४,१२९
६	खुलताबाद	२२८	०.१	५,९४३
७	वैजापूर	२७९	०.२	६०१८
८	गंगापूर	३१,१७३	८.४	२५,९३,५०८
९	पैठण	१,१८७	०.५	३२,४८४

एकूण		४९,२६१	१८.२८	४३,५२,७९५

स्त्रोतः-जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद-२०२१-२२

विश्लेषणः-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद जिल्ह्यामध्ये एकूण सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची संख्या ४९,२६१ आहे. गंगापूर तालुक्यात सर्वात जास्त ३१,१७३ इतके उद्योग आहे, तर दुस-या व तिस-या क्रमांकावर गंगापूर आणि पैठण तालुक्याचा क्रमांक लागतो. त्या ठिकाणी ३१,१७३ व १,१८७ इतके उद्योग आहे. सूक्ष्म उद्योगात देखील सोयगाव तालुका सर्वात मागे आहे. त्या ठिकाणी फक्त ४२ इतके उद्योग आहे. या उद्योगांमध्ये एकूण रोजगार निर्मिती १८.२८ लाख असून सर्वात जास्त ८.४ लाख रोजगार गंगापूर तालुक्यात आहे. व औरंगाबाद दुस-या क्रमांकावर असून त्या ठिकाणी ७.२ लाख रोजगार निर्मिती झालेली आहे. या उद्योगांमध्ये एकूण गुंतवणूक ४३,५२,७९५ लाख रुपये असून सर्वात जास्त २५,९३,५०८ लाख गुंतवणूक गंगापूर तालुक्यात झालेली आहे, तर दुस-या क्रमांकावरील औरंगाबाद तालुक्यात ही गुंतवणूक १६,९४,१२९ लाख रुपये आहे. इतर ६ तालुक्या पेक्षा पैठण तालुक्यामध्ये सुक्ष्म लघु व मध्यम उद्योगातील गुंतवणूक जास्त आहे.

१.३.३३ औरंगाबाद जिल्ह्यातील प्रधानमंत्री किशोर मुद्रा योजनेतील लाभार्थीः-

या योजनेअंतर्गत उद्योग सुरू करण्यासाठी ५०,००० ते ५ लाख रुपयांपर्यंतची कर्ज किशोर कर्जांतर्गत दिली जाते. खालील तक्त्यामध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील प्रधानमंत्री कृषी मुद्रा योजनेतील लाभार्थ्यांची माहिती दिलेली आहे.[३७]

तक्ता क्र. १.३.३३
औरंगाबाद जिल्ह्यातील प्रधानमंत्री किशोर मुद्रा योजनेतील लाभार्थी

अ.क्र	घटक	विभाग	जिल्हा	महाराष्ट्र	जिल्हा	महाराष्ट्र
		वर्ष	२०२१	२०२१	२०२२	२०२२
	किशोर					
१	मंजूर कर्ज	कोटी रुपये	४३५.८७	९,६७८	४६३	९,२१०
२	वितरित कर्ज	कोटी रुपये	४३३.७६	९,४०४	४६०	९,०४९
३	लाभार्थी	संख्या	३७,०१६	७,३०,९८४	४३,०४२	७,५६,८२८

स्त्रोतः- जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद-२०२१-२२

विश्लेषणः-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद जिल्ह्यात किशोर मुद्रा योजना अंतर्गत २०२१ अखेरपर्यंत ४३५.८७ कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते. त्यातील ४३३.७६ कोटी रुपये प्रत्यक्ष वितरण झाले. त्यातील लाभार्थ्यांची संख्या ३७,०१६ होती, त्यात वाढ होऊन २०२२ अखेरपर्यंत ४६३ कोटी रुपये मंजूर करून त्यातील ४६० कोटी रुपये प्रत्यक्ष वितरण करण्यात आले, त्यात ४३,०४२ लाभार्थी होते, तर महाराष्ट्रात २०२१ अखेपर्यंत ९,६७८ कोटी रुपये कर्ज मंजूर करून त्यातील ९,४०४ कोटी रुपये प्रत्यक्ष वाटप करण्यात आले, त्यात लाभार्थ्यांची संख्या ७,३०,९८४ इतकी होती. २०२२ अखेर या कर्जात घट होऊन ते ९,२१० कोटी रुपये इतके झाले. त्यातील प्रत्यक्ष वाटप ९,०४९ कोटी रुपयांचे करण्यात आले. त्यातील लाभार्थ्यांची संख्या ७,५६,८२८ इतकी होती. २०१९ च्या तुलनेत प्रत्यक्ष कर्जाची रक्कम कमी असली तरी लाभार्थ्यांची संख्या मात्र जास्त आहे.

१.३.३४ औरंगाबाद जिल्ह्यातील प्रधानमंत्री तरुण मुद्रा योजनेतील लाभार्थीः-

योजनेअंतर्गत उद्योग सुरू करण्यासाठी तरुण कर्जाखाली ५ लाख ते १० लाखांपर्यंतची कर्जे दिली. जातात खालील तक्त्यामध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील प्रधानमंत्री कृषी मृदा योजनेतील लाभार्थ्यांची माहिती दिलेली आहे.[३८]

तक्ता क्र. १.३.३४

औरंगाबाद जिल्ह्यातील प्रधानमंत्री तरुण मुद्रा योजनेतील लाभार्थी

अ.क्र	**घटक**	**विभाग**	**जिल्हा**	**महाराष्ट्र**	**जिल्हा**	**महाराष्ट्र**
		वर्ष	**२०२१**	**२०२१**	**२०२२**	**२०२२**
	तरुण					
१	मंजूर कर्ज	कोटी रुपये	२२५.४६	७,५६२	२६५	७,२५४
२	वितरित कर्ज	कोटी रुपये	२२३.०१	७,२९१	२६३	७,०५६
३	लाभार्थी	संख्या	३,२४७	१,०३,४०५	३,७३९	९५,०२४

स्त्रोतः- जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद-२०२१-२२

विश्लेषणः-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद जिल्ह्यात २०२१ अखेरपर्यंत २२५.४६ कोटी रुपयांच्या कर्जाला मंजुरी देण्यात आली होती. त्यापैकी २२३.०१ कोटी रुपये प्रत्यक्ष वाटप करण्यात आले व त्यातील एकूण लाभार्थ्यांची संख्या ३२४७ इतकी होती. यात २०२२ पर्यंत वाढ होऊन २६५ कोटी रुपये मंजूर करण्यात आले व त्यातील प्रत्यक्ष कर्ज वितरण २६३ कोटी रुपयांचे झाले. त्यातील एकूण लाभार्थ्यांची संख्या ३७३९ इतकी होती, तर महाराष्ट्रात २०२१ पर्यंत ७,५६२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते. त्यातील प्रत्यक्ष वाटप ७,२९१ कोटी रुपये करण्यात आले. त्याचे एकूण लाभार्थी १,०३,४०५ इतके होते, यात घट होऊन २०२२ अखेपर्यंत ७,२५४ कोटी रुपये मंजूर करण्यात आले. व त्यातील ७,०५६ कोटी रुपये प्रत्यक्ष वितरित करण्यात आले. यात एकूण लाभार्थ्यांची संख्या ९५,०२४ होती. ती २०१९ च्या तुलनेत हे प्रमाण कमी आहे.

१.४.१ संशोधनाची व्याप्तीः-

प्रस्तुत संशोधन विषय हा औरंगाबाद शहरातील बांधकाम उद्योगा अंतर्गत काम करणा-या अकुशल महिला व अकुशल पुरुषांवर करण्यात आलेला आहे. या संशोधनासाठी औरंगाबाद शहरातील ३०० अकुशल महिला व २०० अकुशल पुरुष कामगारांची अभ्यासासाठी निवड करण्यात आली होती. हा विषय वर्तमान काळाशी संबंधित आहे. संशोधनासाठी औरंगाबाद शहरातील विविध कामगार चौक , कामाचे ठिकाण

व प्रत्यक्ष घरी जाऊन कामगारांची मुलाखत घेतलेली आहे. यातील काही कामगार औरंगाबाद शहरातील स्थानिक नागरिक होते, तर काही कामगार इतर ठिकाणावरून औरंगाबाद शहरात कामासाठी आले होते. त्यांचाही अभ्यास या संशोधनात केलेला आहे. प्रश्नावली भरून घेताना नवीन इमारती, रस्ते, पूल,विमानतळ,रेल्वेमार्ग, इमारतींचे नूतनीकरण, इमारतींचे विघटन, इमारतींसाठी साहित्य आणि सामग्रीचे पुरवठा इमारतींसाठी मजूर आणि कामगारांची व्यवस्था करणारे सहाय्यक यांच्याकडून प्रश्नावली भरून घेतलेली आहेत. या अभ्यासामुळे भविष्य काळासाठी शिफारशी सुचविणे शक्य होईल.

१.४.२ संशोधनाचे स्वरूपः-

औरंगाबाद शहर झपाट्याने विकास करत असल्यामुळे या ठिकाणी बांधकाम व्यवसाय मोठ्या प्रमाणात विकसित होत आहे. त्यामुळे या शहरांमध्ये कामगारांची मागणी व कामगारांचा पुरवठा दोन्हीही वाढत आहे. ग्रामीण भागामध्ये कामाची उपलब्धता कमी असल्यामुळे काम करण्यासाठी ग्रामीण भागातून औरंगाबाद शहराकडे येणा-या कामगारांचे प्रमाण खूप जास्त आहे. व त्यामध्ये सतत वाढ होत आहे. या कामगारांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक या समस्यांचा अभ्यास प्रस्तुत संशोधनामध्ये केलेला आहे.

१.४.३ संशोधनाची उद्दिष्टेः-

१) महिला बांधकाम कामगारांच्या उत्पन्नाचा अभ्यास करणे.

२) महिला बांधकाम कामगारांची सामाजिक स्थिती जाणून घेणे.

३) अकुशल पुरुष बांधकाम कामगारांच्या तुलनेत महिला कामगारांची स्थिती जाणून घेणे.

४) सरकारकडून राबवल्या जाणा-या योजनांचा अभ्यास करून त्यात बांधकाम उद्योगातील महिला लाभार्थ्यांचा अभ्यास करणे.

गृहीतक -१ :-

नल हायपोथिसिस (H0), अकुशल पुरुष बांधकाम कामगारांच्या तुलनेत महिला बांधकाम कामगारांच्या उत्पन्नात सांख्यिकीय दृष्ट्या तफावत नाही.

अल्टरनेटिव्ह हायपोथिसिस (पर्यायी गृहीतक) (H1), अकुशल पुरुष बांधकाम कामगारांच्या तुलनेत महिला बांधकाम कामगारांच्या उत्पन्नात सांख्यिकीय दृष्ट्या तफावत आहे.

गृहीतक -२

नल हायपोथिसिस (H0), सरकारी योजनेचा लाभ घेणा-या अकुशल महिला बांधकाम कामगार व अकुशल पुरुष बांधकाम कामगारात सांख्यिकीय दृष्ट्या तफावत नाही.

पर्यायी गृहीतक अल्टरनेटिव्ह हायपोथिसिस (H1) :- सरकारी योजनेचा लाभ घेणा-या अकुशल महिला बांधकाम कामगार व अकुशल पुरुष बांधकाम कामगारात सांख्यिकीय दृष्ट्या तफावत आहे.

गृहीतकाचे परीक्षणः-

गृहीतकाचे परीक्षण t-test च्या माध्यमाने करण्यात आले.

T-test हा सांख्यिकीय चाचणीचा एक प्रकार आहे जो दोन गटांमधील सरासरींचा फरक किती महत्त्वाचा आहे हे ठरवण्यासाठी वापरला जातो. T-test द्वारे, आपण हे तपासू शकतो की दोन गटांमधील सरासरी फरक सांख्यिकीयदृष्ट्या लक्षणीय आहे का, म्हणजे तो फरक योगायोगाने आहे की नाही हे ठरवता येते.

T-test चे काही प्रमुख प्रकार आहेतः-

Independent t-test (unpaired T-test) :- दोन स्वतंत्र गटांच्या सरासरींची तुलना करण्यासाठी वापरला जातो.

Paired T-test:- समान गटाच्या दोन वेगवेगळ्या वेळांवर किंवा परिस्थितींमधील सरासरींची तुलना करण्यासाठी वापरला जातो.

One-sample T-test:- एका गटाच्या सरासरीची तुलना ज्ञात किंवा अपेक्षित सरासरीशी करण्यासाठी वापरला जातो.

T-test च्या प्रक्रियेत सामान्यतः खालील पाय-या असतात**:-**

Hypothesis तयार करणे:- null Hypothesis (H0) हा कोणताही फरक नाही हे सूचित करतो, तर alternative Hypothesis (H1) हा फरक आहे असे सूचित करतो.

T-value गणना करणे:- sample Data च्या आधारे t-value गणना केली जाते.

Degrees Of Freedom (df) ठरवणे:- स्वतंत्र डेटा पॉईंट्सची संख्या ठरवणे.

P-value शोधणे:- t-value चा उपयोग करून p-value शोधली जाते. ही value आपल्याला सांख्यिकीयदृष्ट्या किती महत्त्वाचा फरक आहे हे ठरवण्यात मदत करते.

Conclusion काढणे:- p-value च्या आधारे null Hypothesis स्वीकारणे किंवा नाकारणे. तसेच, t-test वापरण्याचे काही पूर्वअटी आहेत जसे की डेटा सामान्य वितरण (normal Distribution) दाखवणारा असावा आणि variances समजात असाव्या.

या प्रक्रियेतून आपण आपल्या डेटा विषयी ठोस निष्कर्ष काढू शकतो.

T-test सूत्र

$$t = \frac{(\overline{x}_1 - \overline{x}_2) - (\mu_1 - \mu_2)}{\sqrt{\frac{s_1^2}{n_1} + \frac{s_2^2}{n_2}}}$$

या संशोधनात spss या softwerae च्या साह्याने t-test लावण्यात आली.[३९]

१.४.५ संशोधन सामग्रीची निवड:-

प्रस्तुत अध्ययनासाठी औरंगाबाद शहरातील अकुशल महिला व अकुशल पुरुष कामगारांची निवड करण्यात आली होती. अकुशल महिला कामगारांची सामाजिक व आर्थिक स्थिती जाणून घेण्यासाठी अकुशल पुरुष कामगारांची तुलना करणे गरजेचे होते, म्हणून प्रश्नावलीच्या सहाय्याने अकुशल पुरुष कामगारांचीही माहिती गोळा करण्यात आली. विकासात आशिया खंडातील सर्वात वेगाने वाढणारे शहर आणि जागतिक वारसा स्थळे म्हणून गणल्या जाणारी ठिकाणे या जिल्ह्यात आहेत. त्यामुळे औरंगाबाद जिल्ह्यास

एक वेगळे महत्व प्राप्त झालेले आहे. अलीकडील काळात जागतिकीकरण, खाजगीकरण आणि औद्योगिकरणामुळे नवनवीन तंत्रज्ञनाचा प्रसार आणि प्रभाव वाढत आहे. त्यामुळे या शहरात स्थलांतरांचे प्रमाण जास्त वाढले. परिणामी कामगारांची संख्या वाढली, म्हणून राहण्यासाठी घर व उद्योगासाठी इमारत यासाठी बांधकाम क्षेत्रात रोजगाराच्या संधी वाढल्या, म्हणून गावातील मजूर शहरांमध्ये येऊन राहू लागले.[३] त्यात महिला कामगारांचे प्रमाण खूप जास्त असल्याचे दिसून आले. गावाकडून शहरांमध्ये स्थलांतर झालेल्या महिलांना कोण कोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागते यासाठी एकूण ३०० महिला कामगार व २०० पुरुष कामगारांची निवड करून संपूर्ण सामग्रीचे अध्ययन करण्याऐवजी प्रतिनिधीक एककांचा अभ्यास करण्यात आला आहे.[४०]

१.४.६ नमूना निवड पद्धती:-

या संशोधनासाठी गैर-संभाव्यता नमूना निवड अंतर्गत स्नोबॉल नमूना निवड पद्धतीचा वापर केलेला आहे. या पद्धतीमध्ये एका व्यक्तीकडून माहिती गोळा केली जाते व त्याच्या मदतीने दुस-या व्यक्तीपर्यंत पोहोचले जाते. संशोधनातील अकुशल महिला बांधकाम कामगारांची प्रत्यक्ष लोकसंख्या उपलब्ध नसल्यामुळे ३०० महिलांची नमूना म्हणून निवड करण्यात आली होती. अकुशल महिला बांधकाम कामगारांची वास्तव स्थिती समजण्यासाठी अकुशल पुरुष बांधकाम कामगारांची माहिती संकलन करणे गरजेचे होते. म्हणून २०० अकुशल पुरुष बांधकाम कामगारांची निवड स्नोबॉल नमूना निवड पद्धतीने करण्यात आली. नमूना हा प्रातिनिधिक असावा म्हणून औरंगाबाद शहरातील जवळजवळ सर्वच कामगार चौकातून व प्रत्यक्ष बांधकामाच्या ठिकाणी जाऊन माहितीचे संकलन करण्यात आले. माहिती संकलन करतांना उत्तरदात्यांचे प्रमाण महिला ३ व पुरुष २ असे ठेवण्यात आले.[४१]

१.४.७ संशोधन आराखडा

सदरील संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात करण्यात आला.

१.४.८ तथ्य संकलनाची साधनेः-

१.४.८.१ मूलाखतः-

या संशोधनासाठी प्रश्नावली या तंत्राचा वापर करून बांधकाम उद्योगातील अकुशल महिला व पुरुष कामगारांची मूलाखत घेऊन त्यांच्या सामाजिक व आर्थिक विषयाची माहिती गोळा करण्यात आली, यात कामगारांच्या वैयक्तिक, कौटुंबिक, शैक्षणिक व्यावसायिक आणि आर्थिक पार्श्वभूमी वरून माहिती गोळा करण्यात आली.

१.४.८.२ सर्वेक्षणः-

बांधकाम उद्योगातील अकुशल महिला व पुरुष कामगारांचे सर्वेक्षण करून त्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीची माहिती गोळा करण्यात आली. सर्वेक्षणात कामगारांचे शिक्षण, रोजगार, उत्पन्न, आरोग्य, सामाजिक सुरक्षा इत्यादी बाबीं बाबत माहिती गोळा करून बांधकाम उद्योगातील अकुशल महिला कामगारांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीच्या विविध पैलूंचा अभ्यास करण्यात आला.[४२]

१.५ प्राथमिक स्त्रोतः-

संशोधकाने स्वतः अध्ययन क्षेत्रात जाऊन संशोधन समस्येशी संबंधित कामगाराकडून मुलाखत अनुसूची तंत्राच्या साह्याने तथ्यांचे संकलन केले आहे. अनुसूचितील प्रश्नाची उत्तरे विश्वसनीय व अर्थपूर्ण राहण्यासाठी प्रश्नाची निर्मिती करतांना वस्तुनिष्ठ प्रश्नावर भर दिलेला आहे. उत्तरदात्याच्या प्रश्नांसंबधीची आकलन क्षमता लक्षात घेऊन बंदिस्त प्रश्नांना आग्रक्रम देण्यात आला आहे. संशोधनाचा विषय, उद्देश, समग्राची व्याप्ती आणि उत्तरदात्याच्या प्रश्नासंबंधी बंदिस्त प्रश्नाबरोबर मुक्त प्रश्न म्हणजे मिश्रित प्रकारची मूलाखत अनुसूची तयार करुन प्रश्नांना क्रमिक व संरचित करण्यात आलेले आहे. प्रथमतः वैयक्तिक, कौटुंबिक, वैवाहिक, सामाजिक, शैक्षणिक आर्थिक, राजकीय व शासकीय योजनेसंबंधी प्रश्नाची मांडणी करण्यात आली

१.६ द्वितीय स्त्रोतः-

प्राथमिक स्त्रोताला अधिक पुष्ठी देण्यासाठी संशोधकाने द्वितीय स्त्रोतात कामगार तसेच अकुशल महिला कामगार संबधी प्रकाशित व अप्रकाशित साहित्यांचा विचार प्रकरण एक,दोन व तीनमध्ये स्वतंत्रपणे करण्यात आलेला आहे. विविध राज्यातील, विद्यापीठातील संशोधकांचे शोध अहवाल, शासनाचे अहवाल, समित्याचे अहवाल, स्मरणिका, वर्तमानपत्रे, मासिके, सेवाभावी संस्थेचे अहवाल, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल औरंगाबाद विभागातील सांख्यिकी विभागातील नोंदी, विश्वकोश या सारख्या प्रमुख द्वितीय स्त्रोताच्या माध्यमातून मिळणा-या माहितीचा आधार प्रस्तुत अभ्यासात घेण्यात आला आहे.[४३]

१.७ प्रकरण रूपरेषाः-

१.७.१ प्रकरण पहिले- औरंगाबाद शहराची पार्श्वभूमीः-

प्रस्तुत संशोधनातील पहिले प्रकरण हे पूर्णतः द्वितीय स्त्रोतावर आधारित आहे. यामध्ये औरंगाबाद जिल्ह्याची पार्श्वभूमी, औरंगाबाद समग्र आढावा, औरंगाबाद शहराची लोकसंख्या, औरंगाबाद शहराची धर्मानुसार लोकसंख्या, औरंगाबाद शहरातील विविध भाषांची टक्केवारी, औरंगाबाद जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीतील फरक २००१ ते २०११, औरंगाबाद जिल्ह्यातील धर्मानुसार लोकसंख्या सन २०११, औरंगाबाद जिल्ह्यातील तालुक्यांनुसार लोकसंख्या, औरंगाबाद जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी स्त्री-पुरुष प्रमाण, औरंगाबाद जिल्ह्यातील अनुसूचित जाती जमातीच्या लोकसंख्येची तहसील नुसार टक्केवारी, औरंगाबाद जिल्हा ग्रामीण व नागरी लोकसंख्या सन २०११, औरंगाबाद जिल्ह्यातील तालुक्यांनुसार स्त्री-पुरुष लोकसंख्येचे लिंग गुणोत्तर प्रमाण, औरंगाबाद जिल्ह्याची तालुक्यांनुसार साक्षरता, औरंगाबाद जिल्ह्यातील साक्षरतेची प्रवृत्ती, औरंगाबाद जिल्ह्यातील क्षेत्रानुसार साक्षरतेचे प्रमाण, औरंगाबाद जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण, औरंगाबाद जिल्ह्यातील उच्च शिक्षण, औरंगाबाद जिल्ह्यातील कृषी व भौगोलिक क्षेत्र, औरंगाबाद जिल्ह्यातील पिकाखालील क्षेत्र, औरंगाबाद जिल्ह्यातील पशूसंवर्धन, औरंगाबाद जिल्ह्यातील सहकार क्षेत्र, औरंगाबाद जिल्ह्यातील कृषी पंप संच, औरंगाबाद जिल्ह्यातील

विजेचा वापर, औरंगाबाद जिल्ह्यातील उद्योगाबाबतचा तपशिल, औरंगाबाद जिल्ह्यातील मोठ्या उद्योगाबाबतचा तपशिल, औरंगाबाद जिल्ह्यातील संवर्गनुसार कारखान्यांचा तपशिल औरंगाबाद जिल्ह्यातील तालुक्यानुसार सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगाबाबतचा तपशिल, औरंगाबाद जिल्ह्यातील प्रधानमंत्री जनधन योजनेतील लाभार्थी, औरंगाबाद जिल्ह्यातील प्रधानमंत्री शिशू मुद्रा योजनेतील लाभार्थी, औरंगाबाद जिल्ह्यातील प्रधानमंत्री किशोर मुद्रा योजनेतील लाभार्थी, औरंगाबाद जिल्ह्यातील प्रधानमंत्री तरुण मुद्रा योजनेतील लाभार्थी व औरंगाबाद जिल्ह्यातील उत्पन्न इत्यादी या सर्व घटकांचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आलेला आहे.

१.७.२ प्रकरण दुसरे - बांधकाम उद्योग, कामगार व महिलाः-

प्रस्तुत संशोधनातील दुसरे प्रकरण हे पूर्णतः द्वितीय स्त्रोतावर आधारित आहे. यामध्ये कामगार, महिला विविध योजना, श्रमशक्तीचा सहभाग दर, राष्ट्रीय बांधकाम उद्योगातील किमान मूळ वेतन दर, राज्यानुसार मजूरांचा सरासरी मजुरी दर, बेरोजगारीचा दर, राज्यानुसार बेरोजगारीचा दर UR, भारतातील राज्यानुसार बेरोजगारी दर, महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी काम करणा-या महिला, महाराष्ट्रातील दशकानूसार काम करणा-या महिलांची संख्या, कौशल्यानुसार विशेष भत्त्याची रक्कम व किमान मूळ वेतन दर, महाराष्ट्रातील संघटित क्षेत्रामधील स्त्री रोजगार, पुरूषांपेक्षा जास्त स्त्रिया असलेले उद्योग, भारतातील कामगारांची रोजगारानूसार विभागणी, राज्यानुसार कामगार लोकसंख्येचे प्रमाण, राज्यानूसार महिला कामगार लोकसंख्येचे प्रमाण, कामगार-लोकसंख्या गुणोत्तर, मुख्य व्यवसाय गटानुसार बिगर शेती आस्थापनातील स्त्री रोजगार, यानुसार स्त्री कामगार लोकसंख्येचे प्रमाण, बिगर शेती व्यवसायातील मुख्यतः काम करणा-यांचे व्यवसाय, गटानूसार वर्गीकरण, भारतातील माता मृत्युदराचे (प्रमाण लाखात), राज्यानुसार महिलांचे सरासरी विवाह वय, लिंगानुसार जन्मावेळी आयुर्मान, उष्मांक आणि प्रथिने, विशिष्ट वयोगट मृत्यूदर, विशिष्ट वयोगटानूसार जनन क्षमतादर, राज्य विधानसभेत

महिलांचा राज्यनुसार सहभाग, तंबाखू सेवन करणारी लोकसंख्या, या सर्व घटकांचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आलेला आहे.

१.७.३ प्रकरण तिसरे- संशोधन साहित्याचा आढावाः-

या प्रकरणांमध्ये महिला कामगारांविषयीची पुस्तके, संशोधने तसेच शोध लेख यांचा अभ्यास करून त्यामध्ये महिला कामगारांवरील कोणकोणत्या घटकांचा अभ्यास करण्यात आलेला आहे याविषयी थोडक्यात माहिती दिलेली आहे. त्याचबरोबर हे संशोधन इतर संशोधनापेक्षा कसे वेगळे आहे याविषयी माहिती या प्रकरणांमध्ये दिलेले आहेत.

१.७.४ प्रकरणे चौथे - बांधकाम उद्योगातील अकुशल महिला कामगारांच्या सामाजिक समस्यांचा अभ्यास

प्रस्तुत संशोधनातील चौथे प्रकरण हे पूर्णतः प्रश्नावलीतील माहितीवर आधारित आहे. त्यामध्ये बांधकाम कामगारांचे कार्यानुसार वर्गीकरण, बांधकाम कामगारांचे कार्यानूसार वर्गीकरण, बांधकाम कामगारांचे वयानूसार वर्गीकरण, बांधकाम कामगारांची वैवाहिक स्थिती, बांधकाम कामगारांची शैक्षणिक स्थिती, बांधकाम कामगारांच्या पाल्यांचे शिक्षण, शिधा पत्रिका धारक कामगार, बांधकाम कामगारांच्या घराविषयी माहिती, बांधकाम कामगारांचे दरमहा घर भाडे, बांधकाम कामगारांच्या घराचे ठिकाण, बांधकाम कामगारांच्या खोल्यांचे प्रमाण, बांधकाम कामगारांच्या घराची छत, बांधकाम कामगारांच्या घरातील स्वच्छता, बांधकाम कामगारांच्या घरातील पाण्याची सुविधा, बांधकाम कामगारांच्या घरातील इंधनाचे साधन, बांधकाम कामगारांजवळील चैनीच्या वस्तू, बांधकाम कामगारांच्या गल्लीतील सोयी, बांधकाम कामगारांच्या गल्लीतील गैरसोयी, बांधकाम कामगारांना असणारे व्यसन, बांधकाम कामगारांना व्यसन जडण्याचे स्त्रोत, बांधकामाचा आरोग्यावर होणा-या प्रतिकूल परिणामांची स्थिती, बांधकाम कामगारांचे आरोग्यविषयक सेवा सुविधाची स्थिती, बांधकाम कामगारांच्या आरोग्य तपासण्याचे ठिकाण, बांधकाम कामगारांच्या आहराची स्थिती, कामगार अधिका-यांचे मत कामगार संघटनांचे मत ठेकेदारांचे मत,

बिल्डरांचे मत यांची तोंडी मूलाखत घेऊन या सर्व घटकांचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आलेला आहे.

१.७.५ प्रकरण पाचवे - बांधकाम उद्योगातील अकुशल महिला कामगारांच्या आर्थिक समस्यांचा अभ्यास

प्रस्तुत संशोधनातील सहावे प्रकरण हे पूर्णतः प्रश्नावलीतील माहितीवर आधारित आहे. त्यामध्ये बांधकाम कामगारांचे मासिक उत्पन्न, बांधकाम कामगारांचे अपेक्षित खर्च, बांधकाम कामगारांचा वास्तव खर्च, बांधकाम कामगारांचे कामाचे तास, बांधकाम कामगारांची कामावर येण्याची वेळ, बांधकाम कामगारांपैकी उशिरा पर्यंत काम करणा-या कामगारांचा तपशिल, बांधकाम कामगारांचा पगार मिळण्याचा कालावधी, बांधकाम कामगारांना जास्त काम केल्याबद्दल मिळणारा मोबदला, बांधकाम कामगारांना मिळणा-या बोनसची स्थिती, बांधकाम कामगारांना सहकार्याकडून मिळणा-या मदतीचा तपशिल, बांधकाम कामगारांना मिळणा-या पगारी रजेचा तपशिल, बांधकाम कामगारांना पुरवल्या जाणा-या सुरक्षा साधनाची स्थिती, बांधकाम कामगारांच्या बचतिचा तपशिल, बांधकाम कामगारांच्या बचतीचे स्वरूप, बांधकाम कामगारांवरील कर्जाचा तपशिल, बांधकाम कामगारांनी कर्ज घेतलेल्या संस्था, बांधकाम कामगारांनी कर्ज फेड न करण्याचा तपशिल, बांधकाम कामगारांना असणारे व्यसन, बांधकाम कामगारांचा व्यसनावरील मासिक खर्च, या सर्व घटकांचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आलेला आहे.

१.७.६ प्रकरण सहावे - अकुशल महिला व अकुशल पुरुष बांधकाम कामगारांचा तुलनात्मक अभ्यास

प्रस्तुत संशोधनातील पाचवे प्रकरण हे पूर्णतः प्रश्नावलीतील माहितीवर आधारित आहे. त्यामध्ये बांधकाम कामगारांचे बांधकाम उद्योगात येण्यापूर्वीच्या कामाचा तपशिल, बांधकाम कामगारांनी पूर्वीचे काम सोडल्याचा तपशिल, बांधकाम कामगारांनी बांधकाम काम निवळण्याचा तशील, बांधकाम कामगारांचे उद्योगातील अनुभव, बांधकाम कामगारांचे कामाच्या ठिकाणी पोहोचण्याचे साधन, बांधकाम कामगारांचे कामामधील समाधानाची

स्थिती, बांधकाम कामगारांचे कामामधील असमाधानाची स्थिती, बांधकाम कामगारांचे उपक्रमामधील सहभाग, बांधकाम कामगारांपैकी संघटनेचे सभासद न स्वीकारणा-या कामगारांचा तपशिल, बांधकाम कामगारांपैकी संघटनेचे सभासद नसल्यामुळे गैरसोयी, बांधकाम कामगारांपैकी संघटनेने कडून अपेक्षा करणा-या कामगारांचे प्रमाण, बांधकाम कामगारांपैकी कायद्याची माहिती असणा-या कामगारांचे प्रमाण, बांधकाम कामगारांपैकी सामाजिक सुरक्षितते विषयी माहिती असणा-या कामगारांचे प्रमाण, बांधकाम कामगारांपैकी शासनाकडून अपेक्षा ठेवणा-या कामगारांचे प्रमाण, बांधकाम कामगारांपैकी गैरसरकारी संघटनांकडून अपेक्षा ठेवणा-या कामगारांचे प्रमाण, ओळखपत्र धारक बांधकाम कामगार, ओळखपत्र नसणारे बांधकाम कामगार, या सर्व घटकांचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आलेला आहे.

१.७.७ प्रकरण सातवे- सरकारी योजना आणि महिला बांधकाम कामगार

प्रस्तुत संशोधनातील सातवे प्रकरण हे प्राथमिक व द्वितीय माहितीवर आधारित आहे. त्यामध्ये वन स्टॉप सेंटर्स योजना, स्वाधार गृह योजना, अटल पेन्शन योजना, प्रधानमंत्री मातृ वंदन योजना, राष्ट्रीय पोषण अभियान, किशोरवयीन मुलींसाठी योजना (एसएजी), स्वाधार गृह योजना, उद्योगिनी योजना, स्वाधार गृह योजनेंतर्गत गेल्या तीन वर्षात जारी करण्यात आलेला निधी, राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम, महिला शक्ती केंद्र, प्रधानमंत्री आवास योजना, महात्मा फुले जन आरोग्य योजना, बालिका समृद्धी योजना, बेटी बचाव बेटी पढाव योजना, निर्भया फंड, सखी निवासी वसतिगृहे, बेटी बचाओ बेटी पढाओ योजना, सरकारी योजनेतील लाभार्थी, आवास योजना, पेटी योजना, कोविड अर्थ साहय योजना, अवजार खरेदी योजना, अत्यावशक कीट योजना, सेप्टी कीट योजना, शिक्षण कर्ज योजना, कर्ज योजना, आरोग्य योजना या सर्व घटकांचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आलेला आहे.

१.८ प्रकरण निष्कर्ष व शिफारशी:-

या प्रकरणांमध्ये कामगारांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक बाबींचा आढावा घेण्यात आलेला आहे. तसेच संशोधनाचे महत्त्व, संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके, संशोधन पद्धती, व प्रकरणांची रूपरेषा इत्यादी बाबी नमूद करण्यात आलेले आहे. प्रश्नावलीतून प्राप्त उत्तरांची मांडणी करताना असे आढळून आले की अकुशल महिला कामगारांची सामाजिक,आर्थिक व शैक्षणिक स्थिती खूप जास्त खराब आहे.

संदर्भ सूची:-

१ नाथे, स. (२०२०) जग, भारत व महाराष्ट्र भूगोल. नाथे पब्लिकेशन.

२ घारपुरे, व. (२०००) मानवी भूगोल. पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर, नागपूर.

३ खैरनार, द. (२००४) लोकसंख्या आणि समाज. चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद. ४०

४ महाराष्ट्र शासन. (१९७७) औरंगाबाद जिल्हा गॅझेटियर (संशोधित मुद्रण) गॅझेटियर्स डिपार्टमेंट.

५ census 2011. (2011) http://www.census2011.co.in

६ census 2011. (2011) http://www.census2011.co.in

७ census 2011. (2011) http://www.census2011.co.in

८ census 2011. (2011) http://www.census2011.co.in

९ जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद (२०२१-२२)

१० census 2011. (2011) http://www.census2011.co.in

११ census 2011. (2011) http://www.census2011.co.in

१२ census 2011. (2011) http://www.census2011.co.in

१३ census 2011. (2011) http://www.census2011.co.in/census/district/353_aurangabad.html

१४ census 2011. (2011) http://www.census2011.co.in

१५ census 2011. (2011) http://www.census2011.co.in

१६ census 2011. (2011) http://www.census2011.co.in

१७ census 2011. (2011) http://www.census2011.co.in
१८ जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद (२०२१-२२)
१९ जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद (२०२१-२२)
२० जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद (२०२१-२२)
२१ जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद (२०२१-२२)
२२ जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद (२०२१-२२)
२३ जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद (२०२१-२२)
२४ जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद (२०२१-२२)
२५ जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद (२०२१-२२)
२६ जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद (२०२१-२२)
२७ जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद (२०२१-२२)
२८ जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद (२०२१-२२)
२९ जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद (२०२१-२२)
३० जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद (२०२१-२२)
३१ जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद (२०२१-२२)
३२ जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद (२०२१-२२)
३३ जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद (२०२१-२२)
३४ जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद (२०२१-२२)
३५ जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद (२०२१-२२)
३६ जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद (२०२१-२२)
३७ जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद (२०२१-२२)
३८ जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, औरंगाबाद (२०२१-२२)
३९ Tames, g. (2013) 'An introduction to statistical learning with applications in r. Springer science & business media'.
४० पाटील, व्ही. बी. (२००५) संशोधन पद्धती. श्री मंगेश प्रकाशन, नागपूर

४१ 41)Dhivyadeepa, e. (2015) ‘Sampling techniques in educational research’. Lulu.com.

४२ Creswell, j. W. (2014) ‘Qualitative, quantitative, & mixed methods approaches’. Sage publications.

४३ Hamilton, j. (2010) ‘Primary & secondary sources’. Abdo publishing company.